# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. २३ // स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक : १३/१२/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि. १३/१२/२०१९ **शुक्रवार** रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| श्री. ढेकळे सदाशिव गणपत | सौ.देशमुख प्रतिभा गजानन |
| श्री.पोकळे दिलीप बबनराव | सौ.काळे रेश्मा कुंदन |
| श्री. कोल्हे प्रविण रामदास | श्री.लढढा नितीन बालमुकुंद |
| श्री.सनकत चेतन गणेश | श्री.भंगाळे विष्णु रामदास |
| श्री. दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | श्री.बरडे नितीन मनोहर |
| श्री. पाटील राजेंद्र झिपरु | शेख सैईदा युसुफ |

सदर सभेस, मा.उपायुक्त. श्री. मिनानाथ दंडवते, मुख्यलेखा परिक्षक श्री.संतोष वाहुळे, मुख्यलेखाधिकारी, कपील पवार, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा .सदस्य श्री. खडके सुनिल वामनराव यांचा रजेचा अर्ज आलेला असुन तो सभापती महोदया यांनी मंजूर केलेला आहे..

**वंदे मातरमने सभेची सुरुवात झाली.**

१) **नगरसचिव :- विषय क्र. १.** दिनांक २९/११/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**सौ. रेश्मा काळे :-** इतिवृत्त कायम करण्यात यावे.

**श्री. चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री. नितीन लढ्ढा :-** ताई ईतिवृत्ता मध्ये साधारणत: २९/११/२०१९ रोजी झालेल्या स्थायी समिती मध्ये पिंप्राळा रेल्वे उड्डाणपुला संदर्भातील चर्चा या ईतिवृत्तामध्ये वाचली . त्याच्यामध्ये सभापतींच वक्तव्य आहे की, मा.सभापती , एकदा तुम्ही हे पुन्हा करा.एकदा तपासणे आवश्यक आहे आणि प्रॅापर सिमांकन होणे आवश्यक आहे. आणि जर भिंत पुढे आलेली असेल तर ती कशी आलेली आहे ? काय आह ? हे सर्व रेकॅार्डवर आल पाहिजे. माझ्या माहिती प्रमाणे त्यांना आर्मसाठी नोटीसा सुध्दा दिलेल्या आहेत. मग त्याची पुढची सुनावणी का झाली नाही. ती कशी होऊ शकते आपण हे सगळ किती लवकर करु शकतो. तसा सविस्तर अहवाल सभागृहामध्ये होणे आवश्यक आहे. या अनुषंगाने ठराव क्रं. १८८ तो स्थगित करण्यात आला म्हणजे तहकुब ठेवण्यात आला. आणि त्या तहकुब ठरावामध्ये प्रशासनाने सर्व तांत्रिक बाबी तपासुन परिपुर्ण व अचुक प्रस्ताव तयार करून पुढील होणाऱ्या स्थायी समिती सभेसाठी सादर करावा. तदनंतर आपली दि.०६/१२/२०१९ ला पुन्हा आपली स्थायी ची मिटींग झाली तर आज आपली ही दुसरी मिटींग आहे तर प्रशासनाचा अहवाल आपल्याला प्राप्त झालेला आहे का ?

**मा.सभापती :-** चर्चा झालेली आहे, चर्चा सुरु आहे. तो अहवाल त्यांचा तसा तयार करणे सुरू आहे . रेल्वेचे अधिकारी मधे येवुन गेले आणि त्यांनी त्यावेळी काही गोष्टी निदर्शनास आणुन दिल्या होत्या की तेथे आर्म कसा बसु शकत नाही .तरी तिथल्या नागरीकांच्या सोईच्या दृष्टीने आर्म होणे ही गरज आहे. तर त्या दृष्टीने तो कसा बसवता येईल या संदर्भातील चर्चा अजुन सुरू आहे. आणि म्हणुन हा विषय अजुन सभेपुढे आला नाही. आणि हा आर्म उभा करण्यासाठी जेवढी जागा आपल्याला आर्म उभा करण्यासाठी जेवढी लागते आहे. तर त्या संदर्भातील सुनावणी प्रशासनाने सुरू केलेली आहे.

**श्री. नितीन लढ्ढा :-** ती काळाची गरज आहे. आणि दुसरं ताई टाऊन प्लॅनिंग चे अधिकारी नाहीयेत त्याचं सुध्दा उत्तर तुम्ही देतात. आणि दुसरे असे की ताई आज दुसरी की तिसरी सभा असेल की मा.आयुक्त महोदय स्थायी समितीच्या सभेला अनुपस्थित राहतात. तसं त्याच्यावर उपस्थित राहणे हे बंधनकारक नाहीये. परंतु स्थायी समिती ज्या काही महत्वपुर्ण विषयांवर चर्चा करत असते . परंतु आयुक्त या सभेला उपस्थित असणं अपेक्षीत असतं. आज सभेला उपायुक्त सुध्दा दिसतं नाहीये. अशा पध्दतीने जर कधी प्रशासन हलगर्जी पणाने वागतं असेल. तर आपल्या या सभागृहाला किंमतच राहणार नाही.

**मा.सभापती :-** भाऊ मला आत्ता माहिती मिळाली आयुक्त्यांच्या पी.ए कडुन की आयुक्त साहेब आज रजेवर आहेत.

**श्री. नितीन लढ्ढा :-** नाही गुटे साहेबही नाहीयेत.दुसरे उपायुक्तही नाहीयेत.कारण आपण शहराच्या खुप महत्वाच्या विषयांवर चर्चा करत असतो .परंतु त्याला प्रशासनाकडुन अश्या पध्दतीने प्रतिसाद मिळत असेल ते योग्य नाहीये.आणि मा.आयुक्तांना सुध्दा अनुपस्थित राहण्याच्या संदर्भात आपली स्वत:ची परवानगी घेणं आवश्यक आहे. तशी स्थायी समितीच्या कायद्यामध्ये सभापतींना विचारणा करून अनुपस्थितीची परवानगी घेणे सुध्दा कायद्याने बंधनकारक आहे.

म्हणजे कुठलीही पुर्वसुचना न देता आपल्याला अशा पध्दतीने गैरहजर राहणे हे शिस्तीला धरून नाहीये. नगररचनाकार बघतो आपण नाहीये. महत्वाच्या विषयावर आता चर्चा करायची आहे .परंतु नगररचनाकार उपस्थित दिसतं नाहीत.का बरं प्रशासनाला काही कर्तव्य वाटतं नाही का आपले ?

**मा.सभापती :-** नितीनभाऊंनी आता जी सुचना मांडलेली आहे ती खर तर खुप महत्वाची सुचना आहे. कोणत्याही विषयावर चर्चा करून निर्णय घ्यायचा असला तर कोणीही जबाबदार अधिकारी ईथे हजर राहात नाही. चर्चा करायची कशी चर्चा होणार काय चर्चा पुर्णत्वास कशी जाणार .

**श्री. नितीन लढ्ढा :-** मॅडम हा सभागृहाचा अपमान आहे.

**मा.सभापती :-** उपायुक्त साहेब याची प्रशासनाने आपण याची नोंद घ्यायची आहे. की जबाबदार अधिकाऱ्यांनी सभेस उपस्थित असणं अत्यावश्यक आहे.

**श्री. नितीन लढ्ढा :-** याच्यासंदर्भात काय प्रगती आहे, की ती जागा खरेदी करावी लागेल आणि त्या संदर्भातील साधारणत: अपेक्षित खर्च कीती

**श्री. ईस्माईल शेख :-** बाकी ज्या इतर जागा आहे तेथे काही अडचण नाही.

**श्री. नितीन लढ्ढा :-** नाही ईस्माईल साहेब आपण जर बघितल तर हा साधारणत: २९/११/२०१९ ला झालेला विषय आहे. त्याला आज साधारणत: १५ दिवसांचा अवधी गेलेला आहे. ताई ही अशी कामं तीन किंवा चार दिवसांत अपेक्षित असतात ताई .आता तुम्हाला १ वर्षाचा काळ मिळालेला आहे. आपण कितीही पाठपुरावा कराल किंवा कितीही चांगले काम साध्य करू शकतो. परंतु अशा पध्दतीने प्रशासनाकडुन प्रत्येक गोष्टीला विलंब होत असेल. तर निश्चित मी म्हणतो की आपण केलेली सगळी मेहनत त्याच्यावर पाणी फिरलं जातं . त्याच्याने काय होतं की कालांतराने योजनांचे निधी वळवले जातात. सरकारच्या पॉलीसीस बदलतं जातात.आणि पर्यायाने काय होतं की या विकास कामांना किड लागते.याच्यामुळे आपण १०० कोटींचा अनुभव याच्या अनुषंगाने घेतलेलाचं आहे. कि कश्या पध्दतीने १६ महिन्यात निविदा प्रक्रीयेचा विषय १०० कोटींपैकी ४८ कोटी पर्यंत गेला आहे. आणि पर्यायाने काय झालं की शासन बदललं शासन बदलल्याने शासनाच्या प्राथमिकता बदलल्या आणि निधीला स्थगिती मिळाली. पर्यायाने नुकसान कोणाचं झालं या शहराचं नुकसान झालं . काय आहे कमीटमेंट करून तुम्ही निवडुन आले आम्हीही निवडुन आलो आपण लोकांना विकासाचे स्वप्न दाखवलेले आहेत. आणि अशा पध्दतीने प्रशासनाच्या सुस्तबध्द कार्यपध्दतीने तुम्ही , आम्ही दिलेले वचनं पुर्ण करू शकतं नाही. ही अत्यंत गंभीर बाब आहे.आणि हे काम जास्तीत जास्त तिन दिवसांच काम आहे ताई , तिन दिवसांत हा अहवाल पुढच्या मिटींगमध्ये येणं अपेक्षित होतं. आणि यायलाचं पाहीजे होतं. काही नाही खुप मोठा विषय नाहीये. रस्त्यांची लांबी रुंदी मोजायची आहे. लांबी रुंदी मोजुन भुसंपादनाला रेडीरेकनर नुसार किती खर्च अपेक्षित आहे. त्याचा या स्टँडींग समोर तो प्रस्ताव येवुन जायला पाहीजे होता. परंतु प्रशासन खुप कमी संथ गतीने कामं करत असतं की त्यांना गांभीर्य नाहीये ह्या गोष्टींचे , आपण सक्त सुचना द्या की , कमीत कमी तिन दिवसांत त्याच्यासंदर्भातील अहवाल की किती जागा आरक्षित करायला पाहीजे ,त्याचा भुसंपादनाचा मोबादला किती लागेल. त्या अनुषंगाने तातडीने हा विषय कसा मार्गी लागेल आता ५५ कोटी रूपये प्रशासनाकडे पडलेले आहेत. जी कामं शहराच्या नागरीकांच्या हिताच्या दृष्टीकोनातुन , २५ ते ५० हजार लोकवस्तीचा भाग त्या पुलामुळे जोडला जाणार आहे शहराला , आणि तशा कामासाठी त्या निधीचे काय होईल की या निधीची सुध्दा एक वेगळया पध्दतीने वाट लागुन जाईल.मागच्या वेळेला सुध्दा असेच झाले होते . मागील काळामध्ये असेच झाले होते मागील आयुक्त ज्यावेळेला किशोर राजेनिंबाळकर यांनी मार्केट वसुली मधुन २२ कोटी जमा केले होते. त्या २२ कोटींच्या अनुषंगाने आम्ही ठराव सुध्दा केलेला होता. की या २२ कोटींच्या रकमेतुन जेडीसीसी बँकेचे वन टाईम सेटेलमेंट करण्याच्या दृष्टीकोनातुन ती रक्कम आरक्षित ठेवावी . परंतु त्या ठरावाची सुध्दा अवहेलना प्रशासनाने केली. आणि जुन्या मक्तेदारांची देयके अदा करून त्याच्यामधुन टक्केवारी मिळवुन घेतली. म्हणजे या शहराच्या प्रथमिकता तुम्ही, आम्ही ठरवणार कि प्रशासन ठरवणार , खुप गंभीर बाबी आहे हया , म्हणुन आपण कुठेतरी प्रशासन सक्षमरित्या काम करेल अशा पध्दतीच्या सक्त सुचना आपण द्याव्यात अशी आपल्याला आमची विनंती आहे .

**मा.सभापती :-** प्रशासनाने याची नोंद घ्यायची आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १९६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दि. २९/११/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- काळे रेश्मा कुंदन**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव:- विषय क्र. २)** डॉ.श्री.विजय पंडीत घोलप, वैदयकीय अधिकारी यांच्या दोन वार्षिक वेतनवाढी कायमस्वरुपी बंद केल्याच्या व रुपये १००/- चे मुद्रांक शुल्क पेपरवर माफीनाम्याच्या प्रकरणा बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा :-** सन्मा. महोदय, आपण हा प्रस्ताव महोदया सभेपुर्वी वाचला असावा असे मला वाटते. डॉ.श्री.विजय पंडीत घोलप याची प्रस्तावाची पार्श्वभुमि वाचली तरी या सभागृहाला शंभरदा विचार करावा लागेल हा निर्णय घेतांना , सौ.उज्वला उज्वल पंधारे, परिचारीका, दवाखाने विभाग यांनी मा.शिस्तभंग विषयक प्राधिकारी म.न.पा.जळगांव यांचेकडेस " डॉ.घोलप सर माझ्या सोबत अपशब्दांनी बोलले व माझे ॲपरन ओढल्याबाबत " दि.०८/०७/२०१६ रोजी दिलेल्या अर्जाच्या अनुषगांने महिला लैगिक छळ प्रतिबंधक अंतर्गत समिती , जळगांव महानगरपालिका, जळगांव यांनी सादर केलेल्या दि.१६/०९/२०१६ रोजीच्या चौकशी अहवालामध्ये डॉ.श्री.विजय पंडीत घोलप दोषी असल्याचे नमुद केलेले आहे. त्यामुळे डॉ.श्री.विजय पंडीत घोलप, वैद्यकीय अधिकारी, दवाखाने विभाग यांचा जा.क्रं./आस्था/१३९९/२०१६ दि.१९/१०/२०१६ रोजीच्या अंतिम कारणे दाखवा नोटीसीन्वये खुलासा मागविण्यात आलेला होता. त्यानुसार डॉ.श्री.विजय पंडीत घोलप यांनी दिनांक .१९/१०/२०१६ रोजीच्या अंतिम कारणे दाखवा नोटीसीचा खुलासा जा.क्रं./७७९/दवाखाने विभाग / मनपा,जळगांव दि.२३/१२/२०१६ रोजी प्रमुख वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत सादर केलेला असुन , दिनांक १६/०९/२०१९ रोजीच्या चौकशी अहवालामध्ये डॉ.श्री.विजय पंडीत घोलप दोषी असल्याचे नमुद आहे. तसेच दि.२३/१२/२०१६ रोजीच्या खुलाश्यात त्यांनी चुक मान्य केल्याचा खुलासा मान्य करून माफी मागीतलेली आहे. त्यामुळे तत्कालीन आयुक्त यांनी जा.क्रं.जमपा/आस्था/२२४१/२०१७ दि.०४/०१/२०१७ रोजीच्या आदेशान्वये डॉ.श्री.विजय पंडीत घोलप यांच्या दोन वार्षिक वेतनवाढी कायम स्वरूपी बंद करण्यात येवुन रक्कम रू.१००/- मात्रचे मुद्रांक शुल्क पेपरवर माफीनामा व यापुढे जर अशी (उपरोक्त चौकशी अहवालात नमुद) चुक झाल्यास सेवेतुन कायमस्वरूपी बडतर्फ करण्यात यावे असे प्रतिज्ञापत्र इकडेस सादर करणेबाबत कळविण्यात आलेले होते. आता मला सांगा ताई ईतका गंभीर विषय आहे की एकतर या प्रशासना समोर हा विषय सभेमध्ये मांडतांना प्रशासनाच्या मनामध्ये कुठेही काही झालेल दिसतं नाही, आणि सभेमध्ये येवुन सुध्दा कुठलाही अभ्यास न करता हा प्रस्ताव पारीत करणे म्हणजे की आज देश पातळीवर आपण आज बघतोय महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या अनुषंगाने केंद्र सरकार पासुन , राज्य सरकार पासुन सगळया यंत्रणा खडबडुन जाग्या झालेल्या आहेत. आणि अशा परिस्थितीमध्ये एका महिला सहकारी कर्मचाऱ्यावर अशा पध्दतीची , अशी कार्यवाही करणे अत्यंत निंदास्पद आणि घृणास्पद आहे. आणि असा प्रस्ताव प्रशासन पाठवतो कसा काय ? अशा व्यक्तीसोबत सहानुभुति दर्शविणे. म्हणजे कुठेतरी चुकीच्या कामांवर पांघरून टाकणे आहे. किंवा त्यांना बळाबळ देण अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. अत्यंत गंभीर बाब आहे मी तर म्हणतो की दोन वेतन वाढ या कायमस्वरुपी रोखण्यात आल्या. मला माहित आहे की स्थायी समितीला अधिकार आहे की, शिक्षा कमी करणं किंवा जास्ती करणं मी तर म्हणेल की या शास्तीमध्ये वाढ करण्यात यावी.अश्या पध्दतीने महिलांसोबत एक वैद्यकीय अधिकारी, एखादा फोर क्लास चा कर्मचारी अश्या पध्दतीचं काही कृत्य करतो तर आपण त्याच्या मानसिकतेचा संदर्भातील विचार आपण समजु शकलो असतो. की त्याला एज्युकेशन नाहीये, त्याला सराऊंडींग नाहीये. एक उच्च शिक्षित डॉक्टर आपल्या महिला कर्मचाऱ्या सोबत अशा पध्दतीचं वर्तन करतो. हे अशोभनिय आहे. तर अत्यंत घृणास्पद पध्दतीचं वर्तन आहे. अशा पध्यदतीचा काय योग्य निर्णय आपण घेतला असता की कशा पध्दतीने प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करावा. म्हणजे मला सांगा की २०१६ चा प्रस्ताव तीन वर्षानंतर या स्थायी समिती समोर येतो. एक तर याच्या मध्ये दोषी कोण आहे याचा प्रस्ताव आणण्याच्या संदर्भात या गोष्टीमुळे दोनच गोष्टी समोर येतात. एक तर पदाधिकारी मध्ये स्वारस्य असाव किंवा कोणी अधिकाऱ्याच स्वारस्य असाव. किंवा याच्यामध्ये कुठेतरी आर्थिक देवानघेवान झालेली असेल. ही महिला लैगिक छळ समिती पर्यंत जाते ज्याच्यामुळे तिच नाव हे एक्सपोज होईल. तिच्या चारित्र्यावरती जनमानसात फेस करतांना किती अडचणी निर्माण होतील. परंतू ज्या वेळेला अशी महिला समिती समोर जाते. तिथे निश्चित कुठेतरी पाणी मुरलेल असत. काही गोष्टी अत्यंत मनाच्या विपरित घडत असेल. त्या वेळेसच ऐवढ पाऊल उचलल जात की, लैगिक छळ समिती समोर त्या महिलेला जाणे गरजेच वाटत आणि नंतर प्रशासन त्याच्यावर ज्या पध्दतीने पांघरण घालतो हास्यस्पद आहे. उपरोक्त प्रकरणाचे अवलोकन केल्यास असे निदर्शनास येते की, डॉ. घोलप यांचे वर्तन हे सहेतु नसुन कामाचे ओगा मध्ये झालेले दिसुन येते. सौ.उज्वला उज्वल पंधारे यांनी समक्ष व लेखी मांडलेले म्हणणे, डॉ.घोलप यांची विनंती. या सर्व बाबींचा विचार करुन डॉ.घोलप यांच्या दोन वेतनवाढ कायम स्वरुपी बंद करणेच्या निर्णयामध्ये अंशत: बदल करुन दि.०१/०६/२०२० मध्ये देय होणारी वेतनवाढ पुर्वीच्या वेतनवाढीस गृहीत धरुन अदा करण्यात यावी. तथापी मागील कोणतीही थकबाकी आर्थिक बाब डॉ.घोलप यांना देय असणार नाही. तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या निर्णयास्तव सादर. म्हणजे श्री.मुठे साहेब, उपायुक्त, (सा.प्र.) यांनी हा प्रस्ताव पाठविलेला आहे. मी छाती ठोकुन सांगतो की, याच्या मध्ये आपल्या कलीगला वाचविणे किंवा कुठेतरी आर्थिक भ्रष्टाचार झालेला असेल.अन्यथा अश्या पध्दतीच्या प्रस्तावामध्ये मला सांगा ताई कितीतरी कर्मचाऱ्यांना बडतर्फ केले असत किंवा त्याच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही केलेली असते त्याच्या फेवरला कारण की तो स्थानिक कर्मचारी असतो. तो योग्य आहे कि अयोग्य आहे त्याला आपण जवळुन पाहिलेल असतं. कारण २५-३० वर्षापासुन तो आपल्या स्थानिकात काम करत असतो. तश्या वेळेला त्याच्यावर

प्रशासनाने आकसपुर्ण कार्यवाही त्यावर केलेली असेल. त्यावेळेला तो स्थायी समितीसमोर शिक्षा कमी करण्याच्या दृष्टीने आपल्यासमोर विनंती करतो. आणि आपण त्याची ती शिक्षा कमी करण्याच्या संदर्भात ती विनंती मान्य करतो. परंतु प्रशासन त्या ठरावाला ४५१ खाली राज्यशासनाकडे विखंडनाला पाठविते. आणि येथे इतके गंभिर अपराध केलेल्या व्यक्तीला ज्या पध्दतीने पांघरुन टाकल जात आहे मी १००% सांगतो की, यात भ्रष्टाचार झाला असेल किंवा यांचे नाते संबंध जोपासले गेले असतील. अश्या पध्दतीचा प्रस्ताव यायलाच नको होता सभागृहासमोर, आपण पाहिल तर कालच्याच पेपरात बघितल आपण की महिलांच्या सुरक्षतेसाठी २४ तास महिला कार्यरत राहील यंत्रणा आपात्कालीन क्रमांक जाहिर नोकरदार महिलांमध्ये सुरक्षतेची भावना जागणार. महिलांच्या सुरक्षतेसाठी बडीकॉप संकल्पना म्हणजे पोलिस प्रशासन जागृत झालेल आहे. या विषयावर इतक्या गंभिर चर्चा होतांना आज मला सांगा की, त्या महिला कर्मचारींनी कुठेतरी सही केलेली दिसुन येते. आणि त्याचा आधार घेऊन याच्या संदर्भात सांगता की, त्या महिलेची या संदर्भात कुठेही हरकत दिसुन येत नाही. मला सांगा मला तुमच्या हाता खालती काम करायच आहे ताई. तुम्ही माझे वरिष्ठ आहात. आणि या परिस्थितीत जर मला असुरक्षीत वाटत असेल.मी जर तिथे आवाज उठवला तर मला तेथे काम करणे असहाय्य होईल. या भावनेतुन कुठेतरी त्या महिला कर्मचारीने एखाद्या विषयावर सही केलेली असेल. ज्याचा आधार प्रशासन येथे घेत आहे. म्हणजे मला सांगा, ती तक्रार येथे केली त्यानंतर ३ वर्षात तीची माणसीकता बदलली का, आता तो साक्षात्कार झाला. तो सहेतुक झालेल नसल्याच दिसुन येत आहे. म्हणजे ज्या वेळेला एका प्रशासनाने कार्यवाही केली. त्या संदर्भात ना आम्ही तक्रार केलेली होती ना तुम्ही केली ना कोणी तक्रार केली. ज्या महिलेवर तो प्रसंग आला त्या महिलेने केलेली तक्रार, त्या वेळेला जो कोणीही चौकशी अधिकारी असतील. त्या सगळे पुराव्यांच विचार करुन निर्णय घेतला आणि आता परिस्थिती अचानक कशी काय बदलुन जाईल. आणि स्वत: डॉक्टरांनी त्यांची चुक ॲडमिट केलेली आहे. ॲडमिट केलेली असतांना सुध्दा, त्याला पुन्हा वेगळा रंग देऊन पुन्हा वेगळी भाषा करुन सुधारीत करण्याच्या दृष्टीकोणातुन खटाटोप संशयाला कुठेतरी वाव देणारा आहे. याच्या संदर्भात विचार करावा आणि माझी मागणी आहे की, आपण स्वत: एक महिला आहात सभापती म्हणुन, माझ्या पेक्षा आपण महिलांचे दुख चांगल्या पैकी जाणुन घेऊ शकता.आणि या संदर्भात मला असे वाटतं की ही जी दोन वेतनवाढी रोखण्याची शिक्षा होती .त्या शिक्षेमध्ये अजुन वाढ करून , मी म्हणतो की अशा वृत्तींना या महानगरपालिकेच्या सेवेतुन मुक्त करण्याच्या नियोजन करणे संदर्भातला निर्णय या सभागृहाने घ्यावा अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

**श्री. सदाशिव ढेकळे :-** कुठलीही हरकत नाही असे वर्णन या मध्ये केलेले आहे. लेखी स्वरूपात दिलेले आहे की तोंडी असे काय आहे , संबंधित जे कोणी असतील त्यांनी येथे सांगांव .

**श्री. सतिष शुक्ला, आस्थापना अधिक्षक :-** आरोप करणारे आणि ज्यांच्यावर जे आरोप होते ते असे दोघांना बोलावुन . झालेल्या निर्णयानुसार त्यांनी लिहुन दिलेले आहे.

**श्री. सदाशिव ढेकळे :-** त्यांनी लेखी दिले आहे का ?

**श्री. सतिष शुक्ला, आस्थापना अधिक्षक :-** होय , आयुक्त साहेबांसमोर लिहुन दिलेले आहे.

**श्री. सदाशिव ढेकळे :-** लेखी स्वरूपात दिले आहे की माझी काही हरकत नाही. ती फाईल आपण आणलेली असेल तर मा.सभागृहास दाखवावी. सभापती मॅडम त्यात असे बघा की माझी काही हरकत नाही.

**मा.सभापती :-** डॉ.विजय पंडीत घोलप यांनी त्यांच्या कायमस्वरूपी दोन वेतनवाढी बंद केलेल्या होत्या . त्या पुनश्च लागु करणेसाठी मा.आयुक्त साहेब यांना सांगीतले , त्या वेळी सौ.पंधारे , परिचारीका यांनी माझी कुठलीही हरकत नाही असे समक्ष सांगीतले त्याबद्दल स्वाक्षरी त्यावर डॉ.घोलप व सौ.उज्वला उज्वल पंधारे यांची स्वाक्षरी आहे.

**श्री. सदाशिव ढेकळे :-** त्यांनी लेखी दिले आहे त्या बद्दल काही प्रश्न नाही. त्या सौ.पंधारे जे आहेत त्यांनी काही लेखी पत्र दिले आहे का ? असे मी विचारत आहे. स्टॅम्प पेपर वर दिले आहे की लेखी दिले आहे असे.

**मा.सभापती :-** माफीनामा लिहुन दिला आहे.

**श्री. सदाशिव ढेकळे :-** माझी काही हरकत नाही अश्या स्वरूपाच काही पत्र त्यांनी दिले आहे का ?

**मा.सभापती :-** सुनावणी रोजनामा आहे हा त्याच्यावर त्यांनी स्वाक्षऱ्या करून लिहून दिलेले आहे. आयुक्तांसमक्ष ही सही झाली आहे.

**श्री. नितीन लढ्ढा :-** तक्रार जी केली होती ती कोणत्या आकसा पोटी केली होती का ? ती तक्रार खोटी होती का ? एक गोष्ट आहे मी एखादयाला एक झापड मारायची आणि मग नंतर सॉरी म्हणायचं त्याला काही अर्थ आहे का ? म्हणजे मला एक कळत नाही , वास्तविक बघितलं तर त्या पिडीत महिलेचं नांव अश्या पध्दतीने उजागर होता कामा नये. अशा वर्तवणुक , अशा गोष्टी ज्यावेळेला जगजाहीर होतात किंवा चर्चील्या जातात . त्या महिलेच्या वर आणि त्यांच्या कुटुंबावर याचा मानसिक आघात किती मोठया प्रमाणात होत असेल. याचा कधी कोणी विचार करतो का ? आणि अशा पध्दतीने एखादा मोठा कालावधी गेल्यानंतर , मी तुम्हाला सांगतो एक उदाहरण दिले की ज्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हाताखाली तीला काम करायचं आहे. आणि कालांतराने तीला कुठले तरी आमिष दाखवुन किंवा तिच्यावर दबाव आणुन किंवा तीच्या नातेवाईकांकडुन अशा पध्दतीने पुन्हा अशा पध्दतीने आयुक्तांसमोर झालेल्या सुनावणी मध्ये त्यांची हरकत नाहीये . आणि केलेला गुन्हा त्या स्वत: ॲडमिट केलेला होता . ते पाप धुतले जावु शकते का ?

**मा.सभापती :-** निश्चितच नाही.

**श्री. नितीन लढ्ढा :-** म्हणजे तिची हरकत आज जरी नसेल . एखादा मी चोरी केली आणि गैरवृत्तीने मी माल बाहेर घेवुन गेलो आणि प्रशासन त्याची कुठेतरी तक्रार करायला निघालेले आहे. म्हणुन मी पुन्हा ती तिथे आणुन ठेवुन दिली . म्हणजे चोरी झाली नाही असे होवु शकते का ? कारण माझा त्यावेळेला चोरी करण्याचा ईरादा गैर होता. मी घाबरल्याच्या दृष्टीकोनातुन म्हणा किंवा प्रशासन पोलिसात चालले आहे म्हणुन मी आणुन ठेवली . तर त्याच्याने माझे ईरादे स्वच्छ झाले असे नाहीये.जर कधी ती चोरी कोणाच्या लक्षात आली नसती तर मी ती चोरी पचवुन घेतली असती. जर कधी या महिलेने त्यावेळेला महिला लैंगिक समिती कडे तक्रार केली नसती .तर डॉक्टरांकडुन याच्या पुढचे काय पाऊलं उचलले गेले असते. निश्चित पणे काही अघटीत ते घडलं असतं.आणि कुठेतरी त्या महिलेला तोंड दाबुन बुक्क्यांचा मार सहन करावा लागला असता. खुप गंभीर विषय आहे ताई खुप गंभीर विषय आहे. मी म्हणतो की अशा या व्यक्तींना सेवेमध्ये ठेवण्याचा कुठलाही अधिकार नाहीये. आणि या प्रशासनाला सुध्दा अधिकार नाहीये की त्यांचा प्रस्ताव मुव करून समोर आणायचा. म्हणजे पहिले तोंड काळं करायचे आणि पुन्हा अशा पध्दतीचं म्हणजे या सगळया गोष्टी मॅनेज होतात. याच्यातुन असाचं संदेश जाईल . म्हणजे याच्याने अशा अपप्रवृत्तीच्या व्यक्तींना निर्ढावल्या सारखं होईल. की आम्ही कितीही गुन्हे केले तर शेवटी आम्हाला माफी मिळते. म्हणुन आपण गांभीर्याने विचार करावा . आणि सेवामुक्त करण्याच्या संदर्भातील निर्णय या सभागृहाने घ्यावा.

**श्री. राजेंद्र पाटील :-** सभागृहातील कोणताही सदस्य त्याच समर्थन करणार नाही . परंतु कागदपत्रांच्या आधारे जो काय आपल्याला निर्णय घेता येईल तो निर्णय घ्यावा.

**मा.सभापती :-** हा विषय आपण आज तहकुब ठेवु या विषयावर अभ्यास करू व त्यानंतर निर्णय घेवु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई आपण सुध्दा महिला आहात. महिलांचे प्रश्न आपण समजु शकता.

**मा.सभापती :-** या विषयाला दोन बाजु आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तुम्ही जर या विषयात लक्ष घातल. तर एका महिलेला दुसऱ्या महिलेला न्याय मिळेल ऐवढीच आपल्या कडुन अपेक्षा आहे.

**श्री.चेतन सनकत :-** ज्या वेळेला हा विषय पुन्हा सभेसमोर येईल त्यावेळेला ही महिला आणि डॉक्टर यांना दोघांना सभेमध्ये म्हणणे मांडण्यासाठी बोलवावे.

**मा.सभापती :-** सभेमध्ये बोलविण्याची गरज नाही.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १९७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, सौ.उज्वला उज्वल पंधरे,परिचारिका,दवाखाने विभाग यांनी मा.शिस्तभंग विषयक प्राधिकारी,मनपा जळगांव यांचेकडेस " डॉ.घोलप सर माझ्या सोबत अपशब्दांनी बोलले व माझे अपरन ओढल्याबाबत " दि.८/०७/२०१६ रोजी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने महिला लैंगिक छळ प्रतिबंधक अंतर्गत समिती,जळगांव महानगरपालिका जळगांव यांनी सादर केलेलया दिनांक १६/०९/२०१६ रोजीच्या चौकशी अहवालामध्ये डॉ.श्री.विजय पंडील घोलप दोषी असल्याचे नमुद केलेले आहे. तसेच प्रमुख वैदयकीय अधिकारी यांचे मार्फत सादर केलेल्या अहवालामध्ये डॉ.श्री.विजय पंडीत घोलप दोषी असल्याचे नमुद आहे. तसेच स्वत:डॉ.श्री.विजय घोलप यांनी केलेल्या खुलाश्यात त्यांनी चुक मान्य करुन माफी मागीतलेली आहे. त्यामुळे तत्कालीन आयुक्त यांनी डॉ.श्री.विजय घोलप यांच्या दोन वार्षिक वेतनवाढी कायमस्वरुपी बंद केलेल्या आहेत.

परंतू डॉ.श्री.विजय पंडीत घोलप यांचा दि.२०/०२/२०१९ चा प्राप्त अर्ज तसेच परिचारीका सौ.उज्वला उज्वल पंधरे यांचा दि.१७/१०/२०१८ व दि.२०/०२/२०१९ रोजीचे अर्ज प्राप्त झालेनुसार प्रशासनाने सदर प्रकरणी सखोल अवलोकन करुन असे निदर्शनास येते की, डॉ.घोलप यांनी केलेले गैरवर्तन सहेतूक नसून कामाच्या ओघामध्ये झाल्याचे दिसून येते. सौ.उज्वला उज्वल पंधरे यांनी समक्ष व लेखी मांडलेले म्हणणे, डॉ.घोलप यांची विनंती या सर्व बाबींचा सर्वकष विचार करुन " डॉ.घोलप यांच्या २ वार्षिक वेतनवाढी कायमस्वरुपी बंद करण्याच्या निर्णयामध्ये अंशत: बदल करुन दि.०१/०७/२०२० रोजी देय होणारी वेतनवाढ पूर्वीच्या वेतनवाढीसह गृहीत धरुन अदा करणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

सदर प्रस्ताव हा महिला अत्याचार संबंधीचा असल्याने सदर प्रकरणाबाबत पुनश्च: सखोल अभ्यास करणे आवश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव तहकूब ठेवणेत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- काळे रेश्मा कुंदन**

**नगरसचिव:- विषय क्र. ३)** स्वच्छ महाराष्ट्र अभियान(नागरी) अंतर्गत आव्हाणे शिवार गट नं.८६४ जुना हंजीर खत कारखाना या ठिकाणी मैला प्रक्रिया केंद्र उभारणे कामी मक्तेदार / निविदाकार श्री.मकरंद दिलिप सुर्यवंशी यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.१७०% कमीचे दरास व रक्कम रु.२५८०२१८/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हा जो विषय आहे खत फॅक्टरी जवळचा, प्रकल्प उभारणीसाठी किती जागेत उभारणार आहे आणि कोणत्या ठिकाणी उभारणार आहे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** ५० x ५० जागा लागणार आहे आव्हाणे शिवारमध्ये हंजीर बायोटेकच्या ठिकाणीच करणार आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हंजीरची जितकी जागा आहे तितकीच जागा मध्ये करणार का ?

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** हो तितकीच जागा मध्ये करणार आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब इतका कचरा त्या ठिकाणी पडलेला आहे आणि अजुन आपण तिथे प्रकल्प उभारणार. आम्ही विरोध नाही करत आहे. पण या विषयाला व्यवस्थीत करुन हॅन्डल करा. आता ड्रेनेजच काम चालु आहे. तुम्ही बघा आज पेपरला आहे. हे बघा शिवाजी नगर नागरीकांनी विरोध केला. असे लोक करतांना, तुम्ही तिथे व्यवस्थीत पाहणी करुनच विषय मार्गी लावा. नाही तर काय आहे. गल्लोगल्ली पुढारी झालेले आहे. जो येतो आयुक्तांना अर्ज देतो, काम थांबवतो, रोड खोदले जातात. ड्रेनेजचे काम थांबुन जातात. वेळ गेल्यावर निधी वापस जातो. त्याच्यावर काही न काही निर्णय घेऊनच विषय करावा. आणि तुम्ही मला मागच्या वेळेस बोलले होते की, याच्या बरोबरच अमृत योजनेच काम सुरु करणार आहे. आता २५% काम होऊन गेलेल आहे. अमृत योजनेच काम केव्हा सुरु करणार आहे.सांगा मला.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** ते टिम वाढुन आणणार आहे आता.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** केव्हा, नाही तर लेखी द्या आम्हाला त्याच्यावर, रोड खोदुन ठेवलेले आहे आता, पुन्हा अमृतसाठी रोड खोदले जातील. लोकं बोमा मारु राहीले आता. अजुन रोड खोदले जातील. रोडांचा प्रश्न हा प्रश्न तो प्रश्न, शिवाजी नगरची हालत खुप खराब झालेली आहे आता. प्रभाग क्र.१ व २ ची हालत ऐवढी खराब आहे की, लोक आता रोड चालायला नाही. अजुन तुम्ही अमृतचे काम सुरु करणार. करायचे आहे तर बराबर करा. नाही तर ॲबजेक्शन घेण पडीन आम्ही नगरसेवकांना की, काम बंद करा. कारण आम्हाला माहिती आहे आम्ही कस करत आहे आणि लोकांना कस फेस करतो. अमृतच काम सुरु करा या हप्त्यात नाही तर पुढच्या हप्त्यापासुन मी तुम्हाला ड्रेनेजचा काम करु देणार नाही वार्डात. मी तुम्हाला सांगुन ठेवतो.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** चालु करतो.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तुम्ही दंड आकारता, प्रकल्प होणार नाही, आयुक्त साहेबांना नोटीसा येतात. पोकळे साहेबांना सांगत होतो मी, प्रकल्पासाठी दंड आकारता, नोटीसा येतात. त्याची तुम्हाला भिती आहे. त्याच्याशी आम्हाला काही घेण देण नाही.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १९८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव महानगरपालिकेच्या क्षेत्रात सेप्टिक टॅंक मधील मैल्याचे सुरक्षित नियमित व्यवस्थापन करून व त्यावर प्रक्रिया करणेसाठी मैला प्रक्रिया केंद्र बांधण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर कामासाठी शासन निर्णयात दिलेल्या सुचनांनुसार Sludge Drying Bed (SDB) या तंत्रज्ञानावर आधारीत २०,००० लिटर प्रति दिन क्षमतेचा प्रकल्प उभारण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहे. तसेच सदरचा प्रकल्प उभारण्याकरीता खालील प्रमाणे निर्देश उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयात देण्यात आलेले आहेत.

त्या अनुषंगाने जळगांव महानगरपालिकेच्या क्षेत्रात सेप्टिक टॅंक मधील मैल्याचे सुरक्षित व नियमित व्यवस्थापन करून व त्यावर प्रक्रिया करणेसाठी मैला प्रक्रिया केंद्र बांधण्यास एकूण रक्कम रु.२५,८४,६११ मात्रचा खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार सदर कामी शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ई-निविदा करून दैनिक लोकमत या वृत्तपत्रातून दि.१२/११/२०१९ रोजी जिल्हा स्तरावर प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार सदर निविदेमध्ये मुदतीत प्रतिसाद न लाभल्याने शहर अभियंता, मनपा, जळगांव यांचे मान्यतेने उक्त कामास मुदतवाढ देवून, दि.१९/११/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार सदर कामी शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि.२६/११/२०१९ रोजी घेण्यात आलेल्या अहवालानुसार मुदतीत दोन निविदाकारांनी सहभाग नोंदविला असुन शासन निर्णयामध्ये

प्रथम मागणी वेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार लिफाफा क्र.२ (आर्थिक देकार) उघडून आवश्यक ती कार्यवाही करावी असे नमुद आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या दोन ई-निविदांचे निविदाकार यांनी खालील प्रमाणे दर दिलेले आहेत.

| अ.क्र. | मक्तेदाराचे नांव | निविदा रक्कम रु. २५८४५२०/- | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|
| १ | श्री बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स् | निविदा रकमेवर २% जास्तचे दर | २६३६३०४/- |
| २ | श्री मकरंद दिलिप सुर्यवंशी | निविदा रकमेपेक्षा ०.१७०% कमीचे दर | २५८०२१८/- |

निविदाकार श्री मकरंद दिलिप सुर्यवंशी यांचे दर कामाचे निविदा रकमेपेक्षा ०.१७०% कमीचे सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार निविदाकार श्री मकरंद दिलिप सुर्यवंशी यांनी सादर केलेल्या दरानुसार या कामास रक्कम रु. २५८०२१८/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च १४व्या वित्त आयोगाच्या स्वच्छ भारत अभियानासाठी राखीव ठेवलेल्या ५०% निधी मधून करावयाचा आहे. त्यानुसार निविदाकार श्री मकरंद दिलिप सुर्यवंशी, जळगांव यांचे निविदा रकमेपेक्षा ०.१७०% कमीचे दरास नुसार रक्कम रु.२५,८०,२१८/- मात्रची संविदा करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा चे कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव:- विषय क्र. ४)** अड.आनंद एस.मुजुमदार, महानगरपालिका, प्रमुख विधी सल्लागार यांचे दरमहा मानधन **निश्चित करणेबाबत** प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**ॲड श्री.दिलीप पोकळे :-** सदरच्या प्रस्तावामध्ये तुम्ही रु.१५०००/- मानधन वर्णन केलेल आहे. ते रु.१५०००/- कसे आले याची माहिती मिळेल का आम्हाला ? १५०००/- मानधन देणे म्हणजे आपल्या लिफ्टमन चा पगार आणि त्यांचा पगार सारखा देणार आहे का , म्हणजे आपले आयुक्त साहेब आणि त्या लिफ्टमन चा पगार सारखा येईल का आपल्याला , तस करा . म्हणजे जे पण काम आहे ते काम पाहुन तो पगार द्यावा लागेल. म्हणजे १५ हजार मध्ये आम्हालाही थोडसं हे वाटतं. क्लर्क घेत नाही तेवढा पगार तर म्हणजे मीनीमम हिशोब जरी केला तर कामगाराचा पगार तेवढा होतो. हा जो पगार आपण देणार आहे. आणि कामाचं जे स्वरूप आहे. आपल्याला ते वेळोवेळी ते मार्गदर्शन करतील व त्यांनाही कामामध्ये उत्साह वाटला पाहीजे. आणि आपण जी माहिती घेवु त्याच्यामध्ये तरी आपण त्याचं किमान वेतन ते वाढवल पाहीजे . कमीत कमी ते ४० हजार तरी करायला पाहीजे. अशी मागणी सभागृहाला माझी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** असं वाटत आहे पोकळे साहेब की , विधी सल्लागार नेमण्याच्या ऐवजी आपल्या मध्ये आपण एक आणि सभापती ताई एक दोन सदस्य आहेत त्या विधीच्या पदवीधारण केलेले .म्हणजे ते १५ हजार तरी वाचु शकतील आपले.

**मा.सभापती :-** आम्ही तर लॉयर आहोतच पण त्या पदासाठी जर साईन करायची सांगीतली तर आम्हाला आमच नगरसेवक पद सोडावे लागेल. त्यामुळे आपल्याला विधी अधिकारीची तेवढीच गरज आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बघा कश्या पध्दतीने आपल विधी विभाग कार्यरत आहे. ओरीयंटल इन्शोरंस कंपनी, ज्या वेळेला मी महापौर होतो आणि श्री.किशोरराजे निंबाळकरांकडे प्रभारी आयुक्त पदाचा पदभार होता. त्यावेळेला ओरीयंटल इन्शोरंस कंपनीचे ६-७ गाळे फुले मार्केट मध्ये सिल केलेले होते. ॲन वर्कींग पोझीशन मध्ये ते गाळे सिल केलेले होते. त्यांच सर्व कारभार त्यावेळेला ठप्प झाला होता. त्यानंतर त्यांनी जिल्हा न्यायालय मध्ये धाव घेतली. जिल्हा न्यायालयाकडुन सुध्दा त्यांना कुठला रिलीफ मिळाला नाही. तदनंतर त्यांनी उच्च न्यायालयामध्ये धाव घेतली. उच्च न्यायालयामध्ये गेल्यानंतर मे.उच्च न्यायालयाने त्यांना आदेशीत केले की, गाळे भाडे पोटी असेलेली रक्कम रु.१ कोटी ७० लक्ष रक्कम उच्च न्यायालयात भरावी त्यानंतरच त्यांचे सिल गाळे उघडण्यात येईल. त्यांना ४ दिवसांचा अल्टीमेटम दिलेला होता मे.उच्च

न्यायालयाने. आणि मग १ कोटी ७० लक्ष रुपये त्यांनी मे.उच्च न्यायालयात भरले. साधारणत: या गोष्टीला दिड ते दोन वर्ष झाले. १ कोटी ७० लक्ष रुपये मे.उच्च न्यायालयामध्ये पडलेले आहे आपली महानगरपालिकेचे परंतु आपल्या विधी शाखेला किंवा महानगरपालिकेच्या कुठल्याही जबाबदार व्यक्तीला. आपण हे म्हणतो की, आयुक्त साहेब या सभेला दरवेळेला असायला पाहिजे. अश्या पध्दतीने मागील नगरसेवकांचे आपण मानधन देत नाही. का निधीचे टेन्शन आहे. आणि १ कोटी ७० लाख रुपये दिड ते दोन वर्षापासुन उच्च न्यायालयात पडलेले आहे. की आपली ही महानगरपालिका हजार दोन हजार कोटीची मालक झाली जीला आपल्या निधीचीच गरज नाही. छोटे छोटे कामांना आपण सांगतो की, आपल्याकडे निधी नसल्याने आम्ही कामे करु शकत नाही. आणि अश्या पध्दतीचे पौनेदोन कोटी रुपये दोन वर्षापासुन उच्च न्यायालयामध्ये पडलेले आहे. आणि कोणी तजवीज सुध्दा घेत नाही. ते पैसे परत आणण्याच्या संदर्भात की तो आपला हक्काचा पैसा आहे. परंतु कुणाला त्यासंदर्भातील काही घेणं नाही.

**अडॅ.श्री.दिलीप पोकळे :-** नितीन भाऊ आपली जी विधी शाखा आहे . कर्मचाऱ्यांचा भरपुर अभाव आहे. त्या विभागात कमी कर्मचाऱ्यांवर काम होत आहे. त्याठिकाणी दोन लिपीक , शिपाई असा पुर्ण स्टाफ ठेवा. जेणेकरून त्यांना कामाचं नियोजन करता येईल. सर्विस करता येईल . हे जे काही विषय आहेत. आपले काही विषय पेंडींग पडलेले आहेत त्याला पाठपुरावा करता येईल . आणि ते विषय विधी समिती समोर मांडता येतील व सभागृहासमोर मांडता येतील.आता पेंडींग केसेसचा पाठपुरावा करून आणि आपण त्या विषयांवर चर्चा करून निर्णय घेता येईल.तर प्रशासनाने ती कार्यवाही करावी.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदया, राज्य शासनाने एक शासन निर्णय काढलेला आहे. ८ जानेवारी २०१९ महानगरपालिका आयुक्त, मुख्याधिकारी, नगरपरिषद, पंचायत समिती यांच्यासाठी महत्वाच्या पदांसाठी के.आर.ए. निश्‍चित करणेबाबत. शासन निर्णयामध्ये राज्यातील नागरीक क्षेत्रामध्ये सातत्याने वाढ होत आहे. वाढते नागरीकरण हे प्रभावी विकास नागरीकरण करणेसाठी केंद्र व राज्य शासनाच्या महत्वपुर्ण योजनांबाबत कालबध्द व कालमर्यादेत कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने राज्यातील आयुक्त महानगरपालिका, सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका, नगरपरिषद अंती सन २०१८-१९ या मधील विशेष पदोन्नतीतील ३ रिजल्ट ऐरियर्स खातेप्रमाणे घोषित करण्यात येत आहे. त्या मधील व्याख्या की, वाढते नागरीकांची संधी मागुन योजना राबविण्यात याव्या. दुसरं संपुर्ण शहर हगणदारी मुक्त करणे कामी सातत्य राखणे. तिसर शासन परिपत्रक २९ एप्रिल २०१७ नुसार घनकचरा वर्गीकरण मोहिम राबविणे, घनकचऱ्याची १००% वर्गीकरण करणे, तसेच ओल्या कचऱ्याची कम्पोजिटींग करणे दि.३१ मार्च २०१९ पर्यंत. उपरोक्त तिन्ही गोष्टींचा स्वच्छता सर्व्हेक्षण करुन २०१९ मध्ये होणाऱ्या स्वच्छ सर्व्हेक्षण २०१९ अधिक रँक मिळविणे त्याच्यानंतर सेकंड पॅरा, विविध करांची वसुली, मालमत्ता व इतर करांची मागील व चालु ९०% जास्त वसुली करणे व नागरीक स्वराज्य संस्थेच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करणे. स्वउत्पन्नासाठी उपाययोजना, नागरीक स्वराज्य संस्थेच्या उत्पन्नाचा पाया बळकट करुन उत्पन्नामध्ये वाढ करणे, या मध्ये मालमत्ता कर वसुली करीता जी.आय.एस. प्रणालीचा उपयोग करणे, शासनाच्या धोरणानुसार दुकान व गाळे भाडयांचे पुर्नवलोकन करणे, मला सांगा राज्य शासन अश्या पध्दतीने के.आर.ए. इस्टॅबलीश करतो. प्रशासनाचे सर्व अधिकारी काय करता. महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीकोणातुन किंवा अश्या पध्दतीचे कोटयावधी रुपये मनपाचे घेणे आहेत. वसुल होऊन तेथे पडलेले आहे. याच्या संदर्भात कोणत्याही उच्च अधिकाऱ्यानी प्रयत्न का केले नाही. हे कारण असु शकतो की, तेथे कर्मचाऱ्यांचा अभाव आहे. परंतु हेड ऑफ दि डिपार्टमेंट, मा.आयुक्तांना जळगांव शहर महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीची पुर्णपणे जाणीव आहे. पुरेपुरे जाणीव असतांना आपले उत्पन्नाचे स्त्रोत ते वाढविले कसे जातील. किंवा आपल्या ज्या थकबाकी आहे ते कश्या वसुल केल्या जातील. याच्या संदर्भात कोणी दिसल जाणारच नाही कधी. कोणीही प्रयत्न जर विकास कामांसाठी केले किंवा कुठल्यातरी जुन्या थकीत देण्याच्या संदर्भात केले तर स्पष्ट एकच गोष्ट असते आमच्याकडे निधी नाही. आपल्या हक्काचा निधी वसुल करायचा नाही. मग राज्य शासनाचा अश्या पध्दतीने निर्णय काढुन उपयोग काय. मला सांगा आज घनकचऱ्याच्या बाबतीत ३१ मार्च डेडलाईन होती. झाले आहे का आपल. जे डेड लाईन राज्य शासनाने दिल्या. ओला कचरा, सुका कचरा, काहीच नाही सर्व गोष्टी फक्त कागदावर चालु आहे. मी पाहतो, मी काल ही गेलो वल्लभभाई वालजी मार्केट जवळ भंडारा होता. हॉटेल रामनिवासच्या मागे. आर्ध्या एक तासात त्यानी संपुर्ण डंपर भरुन गेला होता. मी फोटो ही काढले आहे. मी तुम्हाला फोटो दाखवेल तुम्हाला सभा झाल्यानंतर. परंतु त्याच्या नंतरची जर परिस्थिती बघाल. चांगले कॉंक्रीटचे रोड आहे तेथे. परंतु त्या सिमेंट कॉंक्रिटच्या रोडवर कमीतकमी ६ इंचेचा थर हा कचऱ्याचा पडलेला आहे. काय स्वच्छ सर्व्हेक्षण आपण राबविला, बाहेर मोठमोठी बोर्ड लागलेली आहे. २००/२०० गुण प्राप्त करायचे आहे. या जाहिरातींवरच मला वाटत की, खर्च जास्त होत आहे. पण रिजल्ट जे आहे ते अत्यंत शुन्य आहे. आपण मागच्या आठवडयात बोललो होतो मागच्या स्थायी समितीच्या मिटींग मध्ये अस्तीत्वात असलेल्या मक्तेदाराच्या कार्यवाही करण्याच्या संदर्भात महासभेत प्रस्ताव येण्याच्या संदर्भात आपण स्वत: सुचना प्रशासनाला दिले होते. मी आपणास विनंती केली होती आणि आपण सुचना केल्या होत्या. आता महासभेचा अजंडा आला कुठेच प्रस्ताव दिसत नाही. पदाधिकाऱ्यांना प्रशासन किती गांर्भियाने घेत आहे हे त्याच उदाहरण आहे. अधिकारी सभेला येत नाही. दिलेल्या सुचनांचा पालन करत नाही. अधिकाऱ्यांनी पदाधिकाऱ्यांना गृहीत धरुन ठेवलेल आहे का ? जे आम्ही करु ते कायदा. मला सांगा इतके सदस्य घरचे काम धंदे सोडुन सभेला येतात. शहरातील विविध प्रभागातल्या समस्या घेऊन येथे चर्चा करता. आपण त्यांना आदेशीत करतात. परंतु त्याची परिस्थिती काय ? जे राज्य शासनाला जुमानत नाही. जे आपल्याला तुम्हाला

जुमानत नाही. मग याच्या पेक्षा हे शहर त्या प्रशासनाच्या हवाले करुन टाकायच. तुम्हाला चालवायच असेल त्यापध्दतीने चालवा. अत्यंत गंभिर बाब आहे. आता तुम्हाला कुठेतरी रणरागीनीचे रुप घ्याव लागेल. काही लोक त्याच्यावर ही टिका करतील. परंतु सौम्य भाषेने प्रशासन जागृत होणार नाही. आता हा महिन्या भराचा गणीत आहे. तुमच्याच दृष्टीकोणातुन सांगतो. आपण जी गोष्ट ताई सांगितली असेल, विहित कालावधी मध्ये त्याचही सादरीकरण तुमच्या समोर होणे अपेक्षित असत. नाही तर अश्या पध्दतीने तुमच टेन्युअर संपुन जाईल. आणि पदनिष्पती काही निघणार नाही. नागरीकांसमोर तुम्हाला खाली मान घालुन चालाव लागेल की, मी प्रयत्न खुप केले. परंतु रिजल्ट मिळाले नाही. आमदार महोदयपण तेच सांगता.निवडणुकीच्या प्रचारात आम्ही फिरत होतो आणि ठिकठिकाणी कचऱ्याचे ढेर पाहुन हिन्न परिस्थिती मध्ये दिसले. बोलले मी माझ पत्र दिलेल आहे. महापौर ताईंनी त्यांच पत्र दिलेल आहे. प्रशासन कुठेतरी गुन्हागाराला वाचविण्याच प्रयत्न करत आहे का? चार चार दिवस कर्मचारी संपावर जाता. संपुर्ण शहराला वेठीस धरल जाते.शेवटी मक्तेदाराला साईटट्रॅक करुन कर्मचाऱ्यांचे पगार बँकेत टाकले जातात. तशी तरतुद सुध्दा नाही. कुठल्या तरतुदीनुसार आपण त्यांचे पगार करत आहे.

**मा.सभापती :-** त्याच पेमेंट आपण केलेलच नाही.

**श्री.दंडवते, उपायुक्त आरोग्य :-** आपण खाजगी कामगाराबाबत एक प्रिंसिपल केलेल आहे. कामगारांना किमान वेतनानुसार आणि पगार मिळायला पाहिजे.

**श्री.नितीन लढढा :-** आता पेमेंट कोणी केल महापालिकेने केल  का ?

**श्री.दंडवते, उपायुक्त आरोग्य :-** नाही. पेमेंट ठेकेदाराने केलेल आहे. परंतु आपण त्याला तश्या प्रकारची नोटीस दिली होती की तु कामगारांना पेमेंट वेळेवर न दिल्यामुळे कामगार या ठिकाणी निवेदन घेऊन आले होते. संप पुकारला होता. तु कामगारांना वेळेवर पेमेंट न दिल्याने ठेकेदाराने ते पेमेंट कामगारांच्या म्हणजे ऑक्टोबर महिन्याचे पेमेंट कामगारांच्या खात्यात द्यावे.

**श्री.नितीन लढढा :-** म्हणजे आपणच दिले ना पेमेंट.

**श्री.दंडवते, उपायुक्त आरोग्य :-** नाही. आपण त्याला पेमेंट खात्यात दिले नाही. आपण त्याला नोटीस दिली होती.

**श्री.नितीन लढढा :-** पेमेंट कोणी मक्तेदाराने दिले का ?

**श्री.दंडवते, उपायुक्त आरोग्य :-** हो मक्तेदाराने दिल आहे.

**श्री.नितीन लढढा :-** मक्तेदाराला आपण किती अदायगी केली.

**श्री.दंडवते, उपायुक्त आरोग्य :-** मक्तेदाराला आपण अदायगी केलेलीच नाही.

**श्री.नितीन लढढा :-** मक्तेदाराने परस्पर पेमेंट दिले. उपमहापौरांच्या पत्रानंतर कुठलच बिल निघालेल नाही.

**श्री.दंडवते, उपायुक्त आरोग्य :-** त्याच्या नंतर बिल निघालेल नाही. मात्र त्याला आपण तशी नोटीस दिलेली आहे.

**श्री.नितीन लढढा :-** मागच्या स्थायी समितीच्या मिटींग मध्ये विषय झाला होता की या संदर्भात तुमच तसा डॉकेट येण अपेक्षित होत.

**श्री.दंडवते, उपायुक्त आरोग्य :-** या बाबत मा.आयुक्त साहेबांशी चर्चा झालेली आहे. प्रमुख विधी सल्लागार मुजुमदार वकील पण होते तिथं.आयुक्त साहेब कदाचित आज आणि उद्या रजेवर आहे. त्यानंतर आयुक्त साहेब वेळ देणार आहेत आणि जि.बी. समोर आम्ही ते ठेवणार आहे.

**श्री.नितीन लढढा :-** या दि.१९/१२/२०१९ च्या जी.बी.समोर तुमच डॉकेट येणार आहे का ?  .

**श्री.दंडवते, उपायुक्त आरोग्य :-** होय.

**मा.सभापती :-** डॉकेट तुमच आलेल नाही.

**श्री.दंडवते, उपायुक्त आरोग्य :-** आता आलेल नाही. आयुक्त साहेब याबाबत प्रत्यक्ष सुनावणी घेणार आहे. वकीलांच अभिप्राय घेणार आहे.

**श्री.नितीन लढढा :-**  आपण त्यांना एक महिन्याची नोटीस दिली होती. एक महिना केव्हा पुर्ण होत आहे. त्यांचा.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** १६ तारखेला.

**श्री.नितीन लढढा :-**  आपण चर्चा करतांना मागे या विषयावर आलो होतो.आणि नोटीसीचा पिरीयेड संपल्यानंतर योग्य ती कार्यवाही करण्याच्या संदर्भात चर्चा झाली होती. आणि येणाऱ्या महासभेसमोर सविस्तर प्रस्ताव आपण सभे समोर ठेवणार.

**श्री.दंडवते, उपायुक्त आरोग्य :-** या मध्ये जर अशी संधी आली तर कोर्टामध्ये आपली बाजु कुठेही मागे राहु नये या अनुषंगाने विधी सल्लागारांशी आयुक्तांनी स्वत: चर्चा केलेली आहे. आणि या संदर्भात आयुक्त साहेब स्वत: निर्णय घेणार आहे. म्हणजे त्याच्या कामांच्या त्रुटी संदर्भात, या पुर्वी दिलेल्या नोटीसी संदर्भात आणि प्रगती कोणकोणत्या घटकात झाली नाही या संदर्भात.

**श्री.नितीन लढढा :-**  शेवटीची नोटीस केव्हा दिली आपण त्याच कालावधी केव्हा पुर्ण होत आहे.

**श्री.दंडवते, उपायुक्त आरोग्य :-** आम्ही त्याला कामांच्या त्रुटींबाबत नोटीस दिलेली आहे. क्लॉज मध्ये अंतिम नोटीसची ही तरतुद आहे. त्याला आपल्या ॲग्रीमेंट प्रमाणे अंतिम नोटीसची ही क्लॉज आहे. त्यासाठी आयुक्त साहेब हेअरींग घेणार आहे. त्या ठिकाणी विधी सल्लागार सुध्दा असतील. आयुक्त साहेब रजेवरुन आल्यानंतर यासाठी वेळ देणार आहे.

**श्री.नितीन लढढा :-** गेल्या ४ महिन्यापासुन प्रशासन फक्त धडपड करत आहे. १००%. मी सांगतो तुम्हाला या मक्तेदाराची तक्रार पहिल्या दिवसापासुन तर आज पर्यंत पहिल्या दिवशी जी तक्रार होती ती तक्रार आज ही कायम आहे. कुठेही मक्तेदारांला ईतक्या संधी देवुन सुध्दा मक्तेदाराच्या कामगीरीमध्ये कुठलीही सुधारणा झालेली दिसुन येत नाही.किंवा या सभागृहातील आमच्या पक्षाचे नगरसेवक असतील किंवा तुमच्या पक्षाचे नगरसेवक असतील. परंतु कुठलाही एकही सदस्य समाधानी नाहीये. आयुक्त साहेब रिटायर्ड होताहेत पुढच्या महिन्यामध्ये मग आपण म्हणाल की मी काय काय केलेले होते , मग आयुक्त म्हणतीलं की मला सगळा अभ्यास करावा लागेल .

**श्री.दंडवते, उपायुक्त आरोग्य :-** याच्यामध्ये या विषया संदर्भात आयुक्त साहेब स्वत: हिअरींग घेणारं आणि आयुक्त साहेब प्रशासनाची जी भुमिका आहे ती मांडणार .

**श्री.नितीन लढढा :-** प्रस्ताव द्या तशी नुसती भुमिका मांडु नका .नाहीतर काय होईल पुन्हा ते कागदावरच राहील.प्रत्यक्षात कुठल्याही धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी होत नाही.

**श्री.विष्णू भंगाळे :-** मागच्या मिटींगमध्येच आपण या विषयावर चर्चा केली होती. म्हणजे स्थायी समितीच्या सभापतींनी आरोग्याच्या विषयावर आपल्या महासभेमध्ये चर्चा केली होती. त्याच्यानंतर सुध्दा आज त्याच्यावर महिना उलटतो आहे तरी त्याच्यावर निर्णय होत नाहीये.

**श्री.दंडवते, उपायुक्त आरोग्य :-** नाही निर्णय म्हणजे या अनुषगांने आयुक्त साहेब स्वत: हिअरींग घेणार आहेत. आणि याच्यामध्ये करारनाम्यातील अटी शर्तीप्रमाणे आयुक्त साहेब हे अंतिम प्राधिकारी आहेत. आणि हिअरींग साठी

**श्री.नितीन लढढा :-** हिअरींग साठी आपण आता..

**श्री.दंडवते, उपायुक्त आरोग्य :-** हिअरींग साठी नाही , आता आयुक्त साहेब दोन दिवस रजेवर आहेत.तर आल्यानंतर सोमवारी किंवा मंगळवारी घेतील.

**श्री.नितीन लढढा :-** आता एखाद्या विषयावर ईतकी चर्चा होत असतांना ,विषय पण हाच होतो की हिअरींग घेतली जाईल, त्यांना संधी दिली जाईल या अनुषंगाने की वॉर्निंग दिली जाईल. निर्णयापर्यंत आपण का येत नाहीत.

**श्री.दंडवते, उपायुक्त आरोग्य :-** नाही अंतिम निर्णय घ्यायचा असेल तर ..

**श्री.नितीन लढढा :-** मला एक सांगा तुम्ही आयुक्तांच्या वतीने येथे बोलता आहेत ना .

**श्री.दंडवते, उपायुक्त आरोग्य :-** बरोबर.

**श्री.नितीन लढढा :-** मग मला एक सांगा येथे ते उपस्थित राहात नाहीत. मग तुम्ही त्यांच्यावर अवलंबुन राहतात. आणि आम्हाला सांगतात की आयुक्त साहेब शेवटची हिअरींग घेणार आहेत. आज आयुक्त असते तर आपण विचारलं असतं की तुम्ही त्या हिअरींग चे मुहुर्त कुठले काढले आहे .

**श्री.दंडवते, उपायुक्त आरोग्य :-** आयुक्त साहेबांबरोबर जी चर्चा झाली त्यात त्यांनी मी सांगीतल की , यावर मी निर्णय घेईन हिअरींग घेवुन .आणि सभागृहापुढे आपण आपली भुमिका ठेवुया.

**श्री.विष्णू भंगाळे :-** सभापती महोदय पुन्हा पुन्हा मांडण्याचं एकच कारण असं आहे की , घंटागाडी आठ दिवसांपासुन जात नाही . किंवा आर्कीड हॉस्पीटल ते एक मिनिट ढेकळे साहेब..

**श्री.सदाशिव ढेकळे :-** एक मिनिट विष्णु भाऊ आपलं ठरलेले आहे की , विषय पत्रिकेवरील सर्व विषय संपल्यानंतर आपण चर्चा करू. चर्चा करून तुम्ही विषयांतर करताहेत. आपण कोर्टाचा विषय आहे आणि हा विषय झाल्यानंतर आपण आरोग्यावर चर्चा करू.

**श्री.विष्णू भंगाळे :-** सभापती महोदय , सभापतींनी हा विषय मांडल्यानंतर सुध्दा यांनी उत्तर दिले नाही. सभापतींनी हा विषय महासभेत मांडला.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** आपले आधीचं ठरले आहे ना की विषय पत्रिकेवरील सर्व विषय संपल्यानंतर आपण सर्व चर्चा करू.

**मा.सभापती :-** सर्व सदस्यांनी खाली बसुन घ्यायचं आहे.विष्णु भाऊ आपण जो विषय करता आहेत त्याबद्दल कुणाचंच दुमत नाहीये. आणि एवढीच विनंती आहे आपल्याला की आता आपण जी काही चर्चा केली .तरी प्रशासनातील जबाबदार अधिकारीचं जर ईथे हजर नसतील तर आपण वाढलेल्या चर्चेला काहीच अर्थ राहणार नाही. ईथे प्रशासनाला माझी सक्त सुचना आहे की , ईथुन पुढे जबाबदार अधिकाऱ्यांनी सभेला हजर राहणं अत्यावश्यक आहे. याची सुचना त्यांच्यापर्यंत पाहोचविण्यात यावी. आज आयुक्त साहेब आणि दोघंही उपायुक्त साहेब हे हजर नसल्यामुळे अनेक प्रश्नांवर फक्त चर्चा होणार आहे , त्याच्यावर निष्पन्न काहीही होणार नाही. म्हणुन त्यांना सक्त सुचना आहे की येथुन पुढील मिटींगला त्यांनी हजर असणं अत्यावश्यक आहे याची त्यांनी नोंद घ्यायची आहे. आपला विषय मुजुमदार वकीलांच्या मानधनाबद्दलचा आहे. त्याबद्दल मी कॅफोसरांना विचारणा करते की , याच्याबद्दल शासनाचे काही निर्देश आहेत का ? की किती असलं पाहीजे मानधन कमीत कमी आणि जास्तीत जास्त .

**श्री.सदाशिव ढेकळे :-** कॅफोंनी याबाबतची माहिती द्यावी. असं गुळगुळीत म्हणतात की स्थायी समितीने ठरवावं असं जे बोलता ते असं जे लिहीतात हे योग्य नाही. मी मागेही बोललो होतो की प्रशासनाचं काय मत आहे या विषयावर ते मांडल पाहीजे. माझे असे म्हणणे आहे.

**श्री. कपील पवार , मुलेअ :-** सर, सन्मा.सभागृह, मानधन कीती ठरवावं असे कोणत्याही शासन निर्णयामध्ये नमुद नाहीये. फक्त आता आपण याचा बेस आपण धरू शकतो म्हणजे जिल्हा परिषदला जो बेस आम्ही मांडला होता. तोच बेस मी येथे सांगु ईच्छितो तर जिल्हा परिषदला आम्ही जर उच्च न्यायालयात केस लढत असतील. तर त्याला परकेस पैसे द्यायचो. आणि त्यात जिंकल्यानंतर वेगळे पैसे राहायचे आणि हरल्यानंतर वेगळे पैसे राहायचे. जर त्यांचा निकाल लागला आपल्या बाजुने तर त्याची रक्कम आम्ही जास्त काढायचो आणि त्यांचे जर विरुध्द लागली तर त्याची रक्कम आम्ही कमी करायचो. त्यात एक तोटा असा होता की, जर केसेस एकाच वेळेला भरपुर आल्यात तर ती रक्कम मोठी जात होती. तर आपली महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बघता ही मानधनाची ठोक रक्कम बरोबर आहे. मला अस वाटत की, या रक्कमेत थोडी वाढ करावी. आणि वाढीवचा बेस जर कोणी विचारल मला तर वाढीवचा बेस काहीच नाही. आता विधी सल्लागाराकडुन माहिती घेतली की, किती केसेस आपला एक वकील लढतो. तर पर केसचे पैसे दुप्पट होता.ही जी यांना रक्कम जात आहे ती कमी जात आहे.

**मा.सभापती :-** तरी ही रक्कम किती पाहिजे.

**श्री. कपील पवार , मुलेअ :-** मला अस वाटत की, रु.२५०००/- पर्यंत असली पाहिजे.अस माझे म्हणणे आहे.

**श्री.**नितीन लढढा :- रु.२५०००/- पर्यंत द्यायलाच पाहिजे.

**मा.**सभापती :- रु.२५०००/- मानधन असल पाहिजे प्रशासनाने नोंद घ्यायची आहे. रु.२५०००/- मानधन त्यांच ठरविले जात आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १९९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, अड.आनंद एस.मुजुमदार, प्रमुख विधी सल्लागार यांचे दि.२०/११/२०१९ चे पत्रान्वये त्यांनी त्यांची महानगरपालिका प्रमुख विधी सल्लागारपदी नियुक्ती झालेली असल्याने त्यांना त्यांचे नियुक्तीपासुनची थकीत मानधनाची रक्कम अदा करणेबाबत विनंती केलेली आहे.

स्थायी समिती ठराव क्रं.१४७ दि.२९/०७/२०१९ अन्वये आयुक्त यांचे कडील जा.क्र.जशमनपा/विधी/१६/२०१९ दि.०६/०९/२०१९ पासुन अड.आनंद एस.मुजुमदार यांची महानगरपालिका, प्रमुख विधी सल्लागारपदी दोन वर्षाकरीता नियुक्ती करण्यात आली आहे. परंतू स्थायी समिती ठरावामध्ये त्यांना दरमहा किती मानधन अदा करावे याबाबत नमुद केलेले नाही.

यापुर्वी अड.केतन जयदेव ढाके यांची मुख्य विधी सल्लागार म्हणुन नेमणुक करण्यात आलेली होती. त्यांना मा.स्थायी समिती ठराव क्रं.२४६ दि.१०/०४/२०१५ अन्वये दरमहा रक्कम रु.१५,०००/- (अक्षरी रक्कम रु.पंधरा हजार मात्र) मानधन निश्चित करण्यात आलेले होते. मात्र सदरचे मानधन हे अत्यंत कमी असून सदर पदाचे महत्व व कामकाजाची कार्यकक्षा पाहता उपरोक्त मानधनात वाढ करुन अड.आनंद एस.मुजुमदार, प्रमुख विधी सल्लागार यांना नियुक्ती आदेशापासून दरमहा रक्कम रु.२५०००/- (अक्षरी रक्कम रु.- पंचवीस हजार मात्र) मानधन अदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- काळे रेश्मा कुंदन**

**नगरसचिव:- विषय क्र. ५)** जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.२८/१०/२०१९ ते दि. ०३/११/२०१९, दि.०४/११/२०१९ ते दि.१०/११/२०१९, दि.११/११/२०१९ ते दि.१७/११/२०१९, दि.१८/११/२०१९ ते दि.२४/११/२०१९ व दि.२५/११/२०१९ ते दि.०१/१२/२०१९, या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २०० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.२८/१०/२०१९ ते दि. ०३/११/२०१९, दि.०४/११/२०१९ ते दि.१०/११/२०१९, दि.११/११/२०१९ ते दि.१७/११/२०१९, दि.१८/११/२०१९ ते दि.२४/११/२०१९ व दि.२५/११/२०१९ ते दि.०१/१२/२०१९, या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव:- विषय क्र. ६)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री.नितीन लढढा :-** मा.सभापती महोदया, आता संविदांमध्ये पार्वती नगर सर्व्हे.क्र.४८०/२ चेनलींग फेंसींग करण्याच्या अनुषंगाने रु.९,९१,५९७/- ची संविदा आहे. आता कस आहे ताई, मी काल शिवाजी भंगाळेंच्या मुलाच लग्न होत मी कोल्हे हिल्सला गेलो होतो. संपुर्ण रस्त्यांची वाट लागलेली आहे. १०० कोटी रुपयांच भविष्य अधातंरीत आहे. अश्या परिस्थितीमध्ये महानगरपालिकेकडे असलेला निधी, ज्या काही योजनांमधलं शिल्लक असेल तो निधी जो काही आपला उत्पन्नाचा स्त्रोत असेल त्यातल प्रत्येक रुपयाच अत्यंत योग्य पध्दतीने सुक्ष्म नियोजन करणे आता क्रमप्राप्त झालेल आहे. अश्या परिस्थितीत आपण १० लाख रुपये असे १०० कोटीचे ज्या वेळेला प्रस्ताव आलेले होते त्यात तब्बल १० कोटीचे काम चेनलींग फेंसींगचे होते. मी वारंवार सांगतो की कामे कुठलीही करा परंतु त्याची प्राथमिकता पहिले ठरवुन घ्या. की बेसीक गरज काय आहे. रस्ता नाही घरी जायला, आवजाव साठी रस्ता नाही. उद्यान उभारुन ठेवल्या, चेनलींग फेनसींग करुन ठेवल्या किंवा विकसीत करुन ठेवल्या तर ही प्राथमिकता नाही होऊ शकत. अश्या पध्दतीने कुठेतरी या गोष्टींना या दृष्टीने स्वत: महानगरपालिकेने आर्थिक स्वात्ता मुबलक होऊन जाईल. ज्या वेळेला खुप निधी शिल्लक राहील त्यावेळेला चेनलींग फेंसींग काय दुसऱ्या काही सुधारणा सुध्दा केले जातील. अश्या पध्दतीचे विषय आहे याच्यावरती कुठेतरी पुर्नविचार व्हायला पाहिजे. असे अनेक कामे आहेत ज्यांचे गरजा आहे परंतु आज नाही. आणि ज्यांच्या गरजा आज आहे ते दुर्लक्षीत होत आहे. प्राधान्य काय शहराच आपण ठरवा की शहरामध्ये प्राथमिक सोईसुविधा या कुठल्या कर्मबादीत यायला पाहिजे याचे प्राधान्य आपण ठरवायच. आणि याच्यात हे भेदभाव ही नाही की, माझ्या वार्डात झाले नाही त्याच्या वार्डात झाले. आता कुठे कुठे आपण समाज मंदिर उभारतो. आज समाज मंदिरांची गरज नाही आज गरज जी आहे. गरज रस्त्यांची आहे, गटारींची गरज आहे. भुयारी गटारींच दुसरा टप्पा ही आपल्याकडुन होणार नाही या पाच वर्षाच्या टेनियुर मध्ये. काही भागांमध्ये गटारी नाही तेथे गटारींची प्राथमिकता असायला पाहिजे. अश्या पध्दती ने जर १०-१० लाख रुपये करुन कोटयावधी रुपये मुलभुत सुविधांसाठी जर कधी खर्च केले निश्चितपणे मी म्हणतो की, नागरीकांना कुठेतरी काही समाधान आपण देऊ शकतो.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** आता भाऊंनी सांगितले, तर ओपनस्पेसला चेंलींग फेंसींग करणे ते सुध्दा महापालिकेच्या हिताच आहे. खुली जागा राहिली. त्या ठिकाणी अतिक्रमण होते. झोपड्या बसता, मग अतिक्रमणासाठी आपल्या पोलिस बंदोबस्त लावाव लागत अतिक्रमण काढाव लागत आणि ते निघत नाही. त्याच संरक्षण करण्याची जबाबदारी आपली आहे. आता पाणीपुरवठा पाईप लाईनचे काम सुरु आहे. त्यामुळे आपल्याला रस्ते व गटारीचे काम करता येणार नाही. हे केलेले काय वाईट आहे. केले पाहिजे असे माझे मत आहे.

**श्री.नितीन लढढा :-** मला चेंलींग फेंसींग लावायला विरोध नाही. प्राथमिकता मी जसे म्हटले की, अमृतचा काम ज्या भागात झालेल असेल. ज्या विभागात भुयारी गटार पुढच्या पांच वर्षात येणार नाही. अश्या ठिकाणी खर्च करा जिथे अमृतच्या योजनेचा भविष्यात कुठल्याही प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही. तेथे कमीत कमी ही व्यवस्था तेथील नागरीकांना देता येईल. ही प्राथमिकता नंतरच्यासाठी राहु द्या. हे करुच नाही या मताचा मी नाही. हे करा परंतु याच्यापेक्षा ही ज्या अत्यावश्यक सोईसुविधा आहे त्याला प्राथमिकता द्या. आणि तद्नंतर हे करा.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** अमृतच कुठलचं काम पुर्ण झालेल नाही.

**श्री.नितीन बरडे :-** नवनाथ भाऊंच्या वार्डातल झाल आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** विकास करतांना सर्व शहराचा विकास करावा लागेल. तेथेच अमृतच झाल, तिथेच रोड तिथेच गटारी, पुर्ण शहराचा विचार करावा लागेल. एकाच प्रभागामध्ये काम करुन चालणार नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, नितीन भाऊंच म्हणण होत की, ज्या भागामध्ये अमृतच २०% किंवा ३०% काम झालेल असेल तर त्याठिकाणी या फंडाचा उपयोग नाल्या व रस्ते बुजविण्यासाठी किंवा रोड व्यवस्थीत करण्याकरीता करावा. कारण त्याच्या बाजुला अंडरग्राऊंड ड्रेनेज होणारच आहे. तो ही रस्ता खराब झाला आहे. परंतु दोन तीन वर्ष हे काम चालणार आहे त्यासाठी जळगांव शहरात आज ॲक्सीडंट खुप मोठया प्रमाणात वाढले आहे. मोठा रोष वाढत आहे जळगांवाचा आणि अक्षरश: धुळ इतकी उडते शहरात की मोटरसायकल चालवणे शक्य होत नाही. हे म्हणणे आहे आमचे बाकी दुसरे काही म्हणणे नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आठ नंबरचा विषय प्रभाग क्र.१ व २ आमच्या प्रभागात ड्रेनेजच काम चालु आहे. आमच म्हणण आहे की, तो जो निधी आहे तो आमच्या प्रभागात खर्च करुन फायदा नाही. कारण तुम्ही ते रस्ते वापस खोदणार आहे.प्रभाग क्र.१ व २ ड्रेनेजचा फेज चालु आहे तेथे आता ते निधी वापरल्यानंतर परत ते रोड खोदले जातील.आमच्याकडचे जे टेंडर असतील ते इंजिनिअर लोकांनी काम करावा. दुसरा विषय असा की, ज्या ज्या ठिकाणी असे कामे मंजुर झालेले आहे. काही ठिकाणचे कामे बाकी आहे तर संबंधीत नगरसेवकांना बोलवुन त्यांना असी सुचना देण्यात यावी ठेकेदारांना.

**मा.सभापती :-** कामासंदर्भात सर्व नगरसेवकांना सुचित करण्यात याव. होत काय काही वेळेला नागरीकांना माहिती मिळते की, या वार्डात काम सुरु आहे. आणि त्यांना नागरीकांना सुध्दा अवगत करायच असत की आपण प्रभागाचे काम सुरु केलेले आहे. नगरसेवकांच्या पाठपुराव्यामुळे वार्डात होत असेलेल काम नागरीकांच्या निर्दशनास येत असत.काम सुरु करतांना नगरसेवकांना कळविण्याची दक्षता घ्यावी.

**श्री.नितीन बरडे :-** दुरुस्तीचे कोणकोणते रस्ते आहे, कमीत कमी आम्हाला तर विचारुन नाही घेतले आहे.

**श्री.नितीन लढढा :-** कारण प्राथमिकता साधारणत: नगरसेवकाला कळते की, कोणत्या रस्त्याची दुरुस्ती करणे गरजेचे आहे.

**श्री.नितीन बरडे :-** आध्यक्ष साहेबा, याच्यात मासिक अहवाल आलाच नाही लेखापरिक्षणाचा.

**मा.सभापती :-** मागच्या मिटींगमध्ये सुचना दिली होती की , प्रत्येक मिटींगला अहवाल देणं आवश्यक आहे.

**मुख्यलेखापरिक्षक , श्री.संतोष वाहुळे :-** माहिती तयार करायचे काम सुरू आहे. संपुर्ण माहिती संकलित करून मागील बऱ्याच कालावधीचा प्रलंबित होत तो पुढील मिटींग मध्ये मी सभागृहापुढे सादर करेल.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब आता आम्हाला समजेल का की ५५ कोटी रूपये जमा झाले होते ते कुठे खर्च झाले ?

**मुख्यलेखापरिक्षक , श्री.संतोष वाहुळे :-** त्याच्याबद्दल मी पुढील सभेमध्ये सांगेल.

**श्री.नितीन लढढा :-** नाही पण आपण ५५ कोटींचे नियोजन केले असेल ना ..

**मुख्यलेखापरिक्षक , श्री.संतोष वाहुळे :-** ५५ कोटींच्या सबंधामध्ये सभापती महोदया , आपली जी देणी प्रलंबित आहे ती प्राधान्याने काढण्याबद्दल प्रशासनाने एक निर्णय घेतलेला आहे. आणि ती देणी देण्याबद्दल प्रशासनाची टप्याटप्याने कार्यवाही सुरू आहे. त्य प्रलंबित देयकांमध्ये एम.एस.ई.बी चे देणे असतील , वाघुर पाणी पुरवठाचे देणे असतील तसेच कर्मचाऱ्यांचे अर्जित रजा , ग्रज्युएटी असेल , शिक्षकांचे पगार असतील या सर्व निधी देण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे . आणि ती देणी देण्याची कार्यवाही सुरू आहे.

**श्री.नितीन लढढा :-** याच्यासंदर्भात वाघुर किंवा एम.एस.ई.बी म्हणा यांच्याबाबतीत एक अप्रॉक्झीमेटली किती निधीची अपेक्षा आहे आपल्याला की आपल्याला त्यावर किती निधी लागु शकेल.

**मुख्यलेखापरिक्षक , श्री.संतोष वाहुळे :-** आपल्याला याच्यासाठी ७२ कोटीं रूपयांची गरज आहे.

**श्री.नितीन लढढा :-** म्हणजे ५५ कोटींमधुन विकास कामांसाठी एक रूपया ही शिल्लक राहणार नाही.

**मुख्यलेखापरिक्षक , श्री.संतोष वाहुळे :-** निश्चितच राहणार नाही.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदया , याच्यामध्ये आपल्याला लक्ष घालावं लागेल .देणी प्रलंबित आहेत ती द्या . परंतु आता आपण भोईटे नगर उड्डाणपुलाचा विषय केला. ज्याची अत्यंत प्राथमिकता आहेत त्यासुध्दा आपल्याला डोळयासमोर ठेवाव्या लागतील. त्याच्यासाठी सुध्दा या ५५ कोटींमधुन काही निधी वेगळा करावा लागेल. कर्मचाऱ्यांची देणी त्याच्यातुन त्यांना काही टप्याटप्याने अदा करता येतील. एम.एस.ई.बी चे असतील त्याच्यामध्येही काही टप्पे पाडता येतील .जी शासकीय देणे असतील त्याच्यामध्ये टप्पे पाडता येतील.परंतु ज्याच्यामुळे मोठया नागरी सुविधा या बाधीत होत असतील , किंवा त्या योजना भविष्यात व्यपगत होतील. त्या दृष्टीकोनातुन प्राथमिकतेने नियोजन करणे खुप गरजेचं आहे. म्हणुन मी म्हटंल की त्याच्या संदर्भात भुसंपादनासाठी किती रक्कम लागेल. म्हणुन ती रक्कम त्या ५५ कोटींतुन बाजुला ठेवले तरचं त्या कामाला कुठेतरी गती येईल . अन्यथा काय होईल की या सगळया गोष्टी कागदावर राहतील , रेल्वे त्याच्या वेगळा विषय मार्गी लावुन मोकळा होवुन जाईल आणि आपल्या शहरातील जनता मात्र त्या विकास कामांपासुन वंचित राहील. ५५ कोटी रुपयांच नियोजन प्रशासनाने सभागृहाला विश्वासात घेतल्याशिवाय करू नये. नाहीतर काय होईल प्रशासन हा स्वत:ला सुप्रिमो समजतोय , आणि तुमच्या प्रायोरिटींपेक्षा त्यांच्या मनामध्ये ज्या प्रायोरिटी आहेत त्यांना प्रशासन प्राधान्य देत असतं. म्हणुन आपण आजच्या स्थायी समोरचा ठराव करून टाका आणि आयुक्तांना तो ठराव द्या. की या ५५ कोटींच आपण कुठलेही नियोजन करतांना सभागृहाला या गोष्टी चर्चेला येणं अपेक्षित आहे आणि त्याला या सभागृहाने मान्यता दिल्यानंतर , ती ॲडमिनिस्ट्रेटीव बाब आहे, तो आयुक्तांचा अधिकार आहे. त्यांनी प्रशासनाने त्या निधीची नियोजन कस करायचं हेही कळत मला परंतु कुठेतरी पदाधिकारी आणि प्रशासन याच्यामध्ये समन्वय नसला आणि प्रशासनाने देणी अदायगी करून टाकल्या नंतर तुमच्या आमच्या मनामध्ये विकास कामांचा , कारण हा निधी संपल्यानंतर मोठा प्रश्न निर्माण होईल. आणि भविष्यात अश्या मोठया रकमा येणं शक्य दिसत नाही तरी तश्या पध्दतीचा ठराव करून प्रशासनाला द्यावा अशी माझी विनंती आहे.

**श्री.नितीन बरडे :-** कर्मचाऱ्यांचे नांव घेतलेले आहे कधीतरी नगरसेवकांच्या मानधनाचे ही नांव घेत जा.

**श्री.नितीन लढढा :-** तेही कर्मचाऱ्यांसारखेच व्यथित आहेत.

**श्री.नितीन बरडे :-** सभापती साहेब मिटींग संपली आहे का ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** नाही अजुन एक विषय बाकी आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २०१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./९१ दि.०२/१२/२०१९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१२ अंतर्गत पार्वतीनगर स.नं.४८०/२ मेहरुण मधील खुल्याजागेस चेनलिंग फेन्सींग करणे व लोखंडी गेट बसविणे कामी मक्तेदार निखिल कृष्णराज पाटील यांचे निविदा रकमेपेक्षा ९.९९% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.९,९१,५९८/- मात्र खर्चाची संविदा.
२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./९३ दि.०४/१२/२०१९ अन्वये प्रभाग क्रं.१२ अंतर्गत डांबरी रस्ते दुरुस्त करणे कामी मक्तेदार श्री.बालाजी इन्फ्राट्रक्चर,जळगांव यांचे वाटाघाटी अंती निविदा रकमेपेक्षा ०३% जास्तीचे सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.२४,३२,३८८/- मात्र खर्चाची संविदा.
३. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./९४ दि.०४/१२/२०१९ अन्वये प्रभाग क्रं.३,१६,१७ अंतर्गत डांबरी रस्ते दुरुस्त करणे कामी मक्तेदार योगराज कंन्स्ट्रक्शन,जळगांव यांचे निविदा रकमेवर ०.१०% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.२४,९३,७३३/- मात्र खर्चाची संविदा.
४. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./९५ दि.०४/१२/२०१९ अन्वये प्रभाग क्रं.११ अंतर्गत डांबरी रस्ते दुरुस्त करणे कामी मक्तेदार श्री.योगराज कंन्स्ट्रक्शन,जळगांव यांचे वाटाघाटी अंती निविदा रकमेवर ०३% जास्तीचे सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.२४,३२,३८८/- मात्र खर्चाची संविदा.
५. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./९६ दि.०४/१२/२०१९ अन्वये प्रभाग क्रं.६ व ७ अंतर्गत डांबरी रस्ते दुरुस्त करणे कामी मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन,जळगांव यांचे निविदा रकमे इतकेच सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.२४,००,०१८/- मात्र खर्चाची संविदा.
६. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./९७ दि.०४/१२/२०१९ अन्वये प्रभाग क्रं.४ व ५ अंतर्गत डांबरी रस्ते दुरुस्त करणे कामी मक्तेदार योगराज कंन्स्ट्रक्शन,जळगांव यांचे निविदा रकमेवर ०.१०% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.२३,३८,३४०/- मात्र खर्चाची संविदा.
७. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./९८ दि.०४/१२/२०१९ अन्वये प्रभाग क्रं.१० अंतर्गत डांबरी रस्ते दुरुस्त करणे कामी मक्तेदार श्री.बालाजी इन्फ्राट्रक्चर,जळगांव यांचे वाटाघाटी अंती निविदा रकमेपेक्षा ०३% जास्तीचे सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.२१,०९,२८०/- मात्र खर्चाची संविदा.
८. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./९९ दि.०४/१२/२०१९ अन्वये प्रभाग क्रं.१ व २ अंतर्गत डांबरी रस्ते दुरुस्त करणे कामी मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन,जळगांव यांचे निविदा रकमे इतकेच सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.२४,८७,८६०/- मात्र खर्चाची संविदा.

**नगरसचिव:- विषय क्र. ७) महानगरपालिका अग्निशमन विभागासाठी** TATA LPT १६१३ Cowl Chassis ४x२ BS-IV १ - **नग आग सुरक्षा निधी अंतर्गत खरेदी करण्यात आली असुन त्यावर फायर फायटरची बांधणी करण्याकामी ई-निविदा सुचना क्र.१४४९ सन २०१९-२० दि.१९/०९/२०१९ अन्वये प्राप्त निविदाकारांपैकी देवी फायर सर्व्हिसेस, सोलापुर यांचे सर्वात कमीचे आलेले न्युनतम दर रक्कम रु.४५,९०,२१८/- मात्रच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ खंड (क) च्या तरतुदीनुसार मान्यता मिळणेबाबत** प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** सदर प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**श्री. नितीन लढ्ढा :-** याच्यामध्ये फक्त एक आहे , स्थायी समिती ठराव क्रं. ५ दि.१५/११/२०१८ तो अधिक्रमीत करावा लागेल , त्याच्यासंदर्भात मागे स्थायी समिती मध्ये निर्णय झालेला होता. तो ठराव रद्द करुन हा ठराव करावा लागेल. या ठरावामध्ये तुम्हाला सुचना द्यावी लागेल की, दि.१५/११/२०१८ रोजी ठराव क्र.०५ हा अधिक्रमीत करण्यात यावा. साधारणत: ताई ही वाहने मनपाच्या ताब्यामध्ये १९ महिन्यापुर्वी आलेली आहे. म्हणजे जे आपण म्हणतो की, प्रशासन ज्या पध्दतीने गतीमान होणे अपेक्षित असत. १९ महिन्यापुर्वी आलेली वाहने आणि अजुन यांच्या बॉडी बिल्डींगसाठी ३-४ महिन्यांचा कालावधी लागेल. म्हणजे अडीच अडीच वर्ष एखादी कामाच्या पुर्णत्वास झालेला हा कालावधी, एकीकडे फायर फायटर आपल्याकडे कमी आहे. एकाच वेळी जर दोन तीन ठिकाणी आगी लागल्या तर कोणाचे ना कोणाचे कुटुंब उधवस्त होतील अशी परिस्थिती निर्माण होते. आणि अश्या परिस्थिती मध्ये १९ महिने चेचीस येऊन पडुन राहता विषय मार्गी लागत नाही. तर प्रशासनाने या गोष्टींचा कुठेना कुठे गांभियाने

लक्ष द्यावा. मी वारंवार हेच म्हणतो की, आपण दिलेल्या निर्देशाचे किंवा सभागृहात झालेल्या सदस्यांच्या चर्चेतुन ज्या ज्या गोष्टी या सभागृहात निर्णय घेतले जातात. त्याची अमंलबजावणी होणे तातडीने अपेक्षित आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २०२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, अग्निशमन व आणीबाणी सेवेकरिता अग्निशमन विभागासाठी आग सुरक्षा निधी अंतर्गत TATA LPT १६१३ Cowl Chassis BS IV -१ नग खरेदी करण्यात आलेली असुन सदर चेसीसवर फायर फायटरची बांधणी करणे कामी ई-निविदा प्रसिध्द करणेस मान्यतेअंती ई-निविदा सुचना क्रं.१४४९ सन २०१९-२० अन्वये प्रसिध्दीअंती चार निविदाकारांनी सहभाग नोंदविलेला आहे. त्यानुसार निविदेत सहभागी झालेले निविदाकारापैकी १) **देवी फायर सर्व्हीसेस,सोलापुर, २) हायटेक सर्व्हीसेस,पुणे** यांनी खालील प्रमाणे दर दिलेले आहेत.

| Sr no | Description of work | Quantity | Rate Including all taxes | |
|---|---|---|---|---|
| | | | Devi Fire Services, Solapur | Hi-Tech Services, Pune |
| १ | Fabrication, Erection, Testing ,Commissioning & Supply of Fire Water Tender On TATA १६१३/४२ BS IV Model Chassis – १ nos provided by Jalgaon Municipal Corporation | 0१ nos | ४५,९०,२१८.१६/- | ४९,३६,६५८.४/- |
| | **Grand Total Rs.** | | ४५,९०,२१८.१६/- | ४९,३६,६५८.४/- |

**देवी फायर सर्व्हीसेस,सोलापुर** यांचे आलेले सर्वात कमीचे दर रक्कम रु. ४५,९०,२१८/-मात्र अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२३% कमी चे आलेले आहेत. सदरचे आलेले दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमीचे असल्याने सदर दर स्विकृत करुन मनपा अधिनियमातील प्रकरण ७ संविदा ७३ (क) नुसार L१ निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच सदर प्रकरणी यापुर्वी पारित झालेला स्थायी समिती ठराव क्रं.०५ दि.१५/११/२०१८ अधिक्रमीत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव:- विषय क्र. ८) महानगरपालिका अग्निशमन विभागासाठी** TATA LPT १६१३ Cowl Chassis ४x२ BS-IV **३ - नग मनपा गाळे भाडे निधी (मनपा फंड) / जिल्हा नियोजन निधी अंतर्गत खरेदी करण्यात आली असुन त्यावर फायर फायटरची बांधणी करण्याकामी ई निविदा सुचना क्र.१४५० सन २०१९-२० दि.१९/०९/२०१९ अन्वये प्राप्त निविदाकारांपैकी देवी फायर सर्व्हिसेस, सोलापुर यांचे सर्वात कमीचे आलेले न्युनतम दर रक्कम रु.१,३७,७०,६५४/- मात्रच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ खंड (क) च्या तरतुदीनुसार मान्यता मिळणेबाबत** प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** लवकर करा. अभिनंदन त्या विभागाच.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** आता या ठिकाणी वकील पॅनलचा विषय निघाला होता तर एक विषय असे ही पेन्डींग आहे मागे ही बोललो होतो मी तलावाच्या संदर्भात तलावाला स्टे लावला आहे ज्याला आपण दिला होता तलाव मांसे पकडण्यासाठी, त्याला २५ वर्ष झाले अजुन स्टे आहे. मी मागच्या मिटींगला ही बोललो होतो. त्याचा खुलासा आहे का ? काही लागले आहे का कामाला विधी शाखा.

**श्री.भोळे, विधी शाखा प्रमुख :-** संबंधीत दावा जगदंबा मांसे उद्योग यांनी दावा सन २००७ मध्ये केलेला होता.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आजची परिस्थिती काय आहे.

**श्री.भोळे, विधी शाखा प्रमुख :-** त्याने हायकोर्टात दावा केला होता की, कलेक्टरकडे रिपोर्ट करावा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** इतके दिवसात या केसच काय झाल.

**श्री.भोळे, विधी शाखा प्रमुख :-** त्याची सुनावणी झाली होती.

**श्री.विष्णु भंगाळे :-** कितीदा सुनावण्या झाल्यात.

**श्री.भोळे, विधी शाखा प्रमुख :-** ते माहित नाही. मी नव्हतो त्या वेळेस.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आज काय निकाल आहे.

**मा.सभापती :-** आजच्या परिस्थितीत केस हायकोर्टात पेन्डींग आहे. त्याची संपुर्ण माहिती मी घेतलेली आहे. आजच्या तारखेत असे दिसत आहे की, तलाव हा राज्य शासनाचा असल्यामुळे कलेक्टरला पार्टी करावे अशी त्यांनी मागणी केली होती. जळगांव जिल्हा न्यायालयाने तो अर्ज त्यांचा रद्द बातल ठरविला. त्यामुळे ते पुन्हा एकदा उच्च न्यायालयात गेलेले आहे. या केसच स्टेटस काय आहे मी हायकोर्टाच्या वकीलाकडुन जाणुन घेते आणि हा विषय मार्गी लावते.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** प्रशासनाने गतीमान व्हावे. बघा एक उदाहरण आहे. माझ्या वार्डामध्ये काम केले पुर्वी एका मक्तेदाराने जवळपास त्याला ८-९ वर्ष झाले आणि तो एक्सपायर झाला. त्याच बिल अजुन पर्यंत दिल गेल नाही. मग त्याच्या पत्नीने एक ॲपालीकेशन दिल की माझे पती असे असे एक्सपायर झाले त्याचे पेन्डींग बिल द्यावे. त्याचे सर्व कागदपत्र एक महिन्यापसुन प्रशासनाकडे आहे. मी काल तपास केला. कोणी म्हणत मला माहित नाही. कोणी म्हणतो माझ्याकडे आले नाही. अश्या प्रकारचे हे कामे आहे. त्याच्यात सुधारणा व्हावी. तुम्ही विचारा अकाऊंट वाल्यांना. कोण आहे.

**श्री.नितीन लढढा :-** ढेकळे साहेब तेथे जिवंत माणसाला न्याय मिळत नाही. तुम्हीतर मेलेल्याची अपेक्षा करत आहे. त्याच्या पत्नीला न्याय दिला पाहिजे.

**मा.सभापती :-** या संदर्भात अकाऊंटची कोणाला माहिती देता येईल.पाहते मी का पेन्डींग आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** ते जे बिल त्यांनी केल आहे. ते कुठे आहे हे सुध्दा माहित नाही असे म्हणता आपले लोकं.

**श्री. कपील पवार , मुलेअ :-** याची माहिती मी आपल्याला मिटींगनंतर एका तासात कळवितो.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** त्यांच्या एका नातेवाईकानी सांगितले की, आपण आपल्या सहीने मुन्ना शर्माकडे पाठविले. परंतु जेव्हा मी विचारले की, पुढची काय पोझिशन आहे. तर मुन्ना शर्माकडे तुम्ही पाठविल. त्यांना विचारले माहिती नाही नंतर दुसरे एक पाटील आहे त्यांना विचारल ते म्हणता माहिती नाही. आम्ही इकडे आहे. अश्या प्रकारच बोलल जात. असे योग्य नाही. तुम्ही याची माहिती ठेवा. तर त्यांच्या पत्नीला न्याय द्या.

**श्री. कपील पवार , मुलेअ :-** मी माहिती घेऊन सांगतो.

**श्री.नितीन लढढा :-** मा.सभापती, रस्ते दुरुस्तीच्या संदर्भात आपण एक विषय मान्य केला होता.एकच मक्तेदार आहे. योगराज कन्स्ट्रक्शन विषय क्र.६/४ वरील प्रमाणे आलेले दर पाहता योगराज कन्स्ट्रक्शन यांनी निविदा रक्कमेवर ०.५% कमीचे दर जास्तीचे असून मक्तेदाराला वाटाघाटीसाठी बालविले असता मक्तेदाराने ०.३% जास्तीने काम करणे लेखी संमती दिली. म्हणजे हा ०.३% दुसरा डी.एच.पाटील कन्स्ट्रक्शन त्याच पध्दतीचा काम तो निविदा रकमेवरती करत आहे. परत विषय क्र.६/६ पुन्हा मक्तेदार योगराज कन्स्ट्रक्शन हेच काम ०.१०% करत आहे. एकीकडे तोच मक्तेदार योगराज कन्स्ट्रक्शन काम ०.३% करतो आणि दुसरीकडे तोच मक्तेदार काम ०.१०% करतो. अश्या पध्दतीची ही वाटाघाटीची प्रथा कश्या पध्दतीने पार पाडली जाते ते काही समजत नाही. सिमीलर काम आहे सगळे, डांबरीकरणाने रस्ते दुरुस्ती करणे, एक मक्तेदार कधी निविदा रकमेत काम करायला तयार असेल तर मला ही अपेक्षा आहे की, बाकी मक्तेदारांनी सुध्दा, पण येथे एकच मक्तेदार आहे. तो एका कामामध्ये वेगळा कोड करत आहे वाटाघाटी अंती आणि दुसऱ्या कामामध्ये वेगळ दर कोड करत आहे. आपण वाटाघाटी कश्या पध्दतीने करतो, की रेंडमली करतो की काही नाव ठेवायच आहे २%करुन दे ३% करुन दे. ५% करुन दे.

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** ज्या ज्या ठिकाणी कॉम्पीटीशन झालेले आहे. त्या त्या ठिकाणी दर बिलो गेलेले आहे. ज्या ठिकाणी कॅम्पीटीशन झालेल नसल त्या ठिकाणी ५% अबाऊ दर आलेले आहे. जे आपण मागच्या स्थायीला वार्ड क्र.१३ व १४ आपण मंजुर केले आहे. जरी ५% अबाऊ ज्या ठिकाणी आलेले आहे ते ते जवळपास त्यांना ३% पर्यंत खाली आणुन देतो.

**श्री.नितीन लढढा :-** निगोसिएशन मधला विषय आहे, ज्या वेळेला निगोसिएशन होते. एका मक्तेदाराचा एकाच कामाच्या संदर्भात भलेच प्रभाग वेगवेगळे असतील. परंतु निगोसिएशन मध्ये दर कमीतकमी समान यायला पाहिजे. मक्तेदार वेगळा असेल तर आपण समजु शकतो की मला याच्या खालती काम करायच नाही.एकच मक्तेदार एका प्रभागामध्ये ०.१०% मध्ये काम करायला तयार आहे. तोच मक्तेदार दुसऱ्या प्रभागात ३% कमीने काम करायला तयार आहे.ही विसंगती कशी दिसत आहे. हे गोष्टी कागदावरती डोळयांना पटत नाही. ज्या वेळेला आपण वाटाघाटी करतो तर वाटाघाटीचा अर्थच काय ? कुठेतरी दरांमध्ये समानता यायला पाहिजे. महानगरपालिकेचा जो काही निधी आपण वाचवु शकता वाचविण्याच्या संदर्भात आपल कौशल्य पडायला पाहिजे. एखादा व्यक्ती डि.एस.आर. रेट मध्ये काम करत असेल तर त्यामध्ये आपण मक्तेदाराला सांगु शकतो की, एक व्यक्ती डि.एस.आर. रेट मध्ये काम करतो म्हणजे त्याला परवडत आहे याचा अर्थ ते तुलाही परवडायला पाहिजे. किंवा जो डि.एस.आर. रेट मध्ये काम करत असेल मग त्याच काम दुरुस्त आहे का ? की याच काम सुपेरियर आहे. हा एक प्रश्न निर्माण होतो.तर थोडस वाटाघाटी करतांना योग्य प्रमाणावर वाटाघाटी होईल याच आपण लक्ष ठेवाव.

**श्री.नितीन बरडे :-** परवा एक बातमी आली होती. अतिक्रमण विभागाची की, नितीन बरडे यांच्या दबावात अतिक्रमण विभागाने जप्त केलेले साहित्य परत. मी जे साहित्य परत केले ती कार्यवाही कुठे केली होती.

**श्री.एच.एम.खान, अतिक्रमण अधिक्षक :-** आर.टी.ओ.ऑफिस जवळ केली होती.

**श्री.नितीन बरडे :-** मी १२.०० वाजेला महानगरपालिकेला आलो होतो. मी सांगितले की, हे किरकोळ साहित्य आहे परत करुन द्या. ही कार्यवाही करत असतांना एवढच साहित्य होत का ? एवढच साहित्य होत का एवढेच गाडया होत्या का? ह्या गाडया चालु होत्या का बंद होत्या.

**श्री.एच.एम.खान, अतिक्रमण अधिक्षक :-** तीन लोटगाडया होत्या.

**श्री.नितीन बरडे :-** ह्या गाडया चालु होत्या का बंद होत्या.

**श्री.एच.एम.खान, अतिक्रमण अधिक्षक :-** एक गाडी चालु होती, दोन गाडया बंद होत्या.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब ही जी गाडी होती एका अपंगाची गाडी होती. चार दिवस झाले बंद होती तर एका साईटला लावलेली होती. त्या नंतर दोन खुर्च्या आणि एक टेबल उचलुन आणल. ते टेबल खुर्च्या अश्या मुलाचे आहे ज्याला जन्मता आम्ही बघतोय. जो एम.बी.ए. पास झाला आहे, एम.पी.एस.सी.ची परिक्षा देत आहे. त्याला वडील नाही. आई आहे एक भाऊ आहे लहान. यांना तो सांभाळत आहे पाणीपुरीची गाडी लावतो. हा फोटो बघा मी तुम्हाला मोबाईलवर पाठविल. काव्यरत्नावली चौकात जेव्हा हे गेले मी तेव्हा या दुकानासाठी आलो होतो महानगरपालिकेत. हे दुकान १५ दिवस झाले कपडयाच कोणाच्या आशिर्वादाने चालु होत. याच अतिक्रमण केव्हा काढल जेव्हा मी नगरपालिकेत येऊन गेलो. ३.०० वाजता हे अतिक्रमण काढल आणि याच किती साहित्य जमा केलेल आहे. याच किती साहित्य जमा केलेल आहे.

**श्री.एच.एम.खान, अतिक्रमण अधिक्षक :-** यांचे १३ ड्रेस आणि २ साडया जमा केलेले आहे.

**श्री.नितीन बरडे :-** या फोटोत बघा साहेब याच्या १३ ड्रेस आणि २ साडया आहे का ? काव्यरत्नावली चौकात तुम्ही असे मोठया दुकानी लावुन देता. महिना महिनाभर चालतात ते. तुम्ही गरीब लोकांच साहित्य उचलुन आणलेल आहे. मला सांगा अतिक्रमणाने त्या विभागात कार्यवाही केली. आकाशवाणी पासुन पुढे तुम्हाला किती अतिक्रमण दिसते. प्रत्येक टर्न जेथे टर्न होत. आकाशवाणीचा चौक, रॉयल पॅलेस हॉटेलचा टर्न घ्या. पेट्रोल पंपाच घ्या याच्या बघा किती अतिक्रमण आहे. तुम्ही कोर्टापासुन तर गणेश कॉलनी पर्यंत तुम्ही मला दाखवा. बाबासाहेब आंबेडकरच्या पुतळयाजवळ दोन गाडया आहे. कॉलेज आहे शाळा आहे. किती तरी मुलींना त्रास होत आहे कॉलेजच्या.तुमच्यात हिम्मत असेल तर ते गाडया काढुन दाखवा.

**श्री.एच.एम.खान, अतिक्रमण अधिक्षक :-** आम्ही एक एक करुन कार्यवाही करतच आहोत.

**श्री.नितीन बरडे :-** तेथे गाडया आहे, टेबल आहे, खुर्च्या आहे ते का उचलत नाही. बंद गाडया का उचलता, जानताराजा व्यायाम शाळाच्या बाजुला १५ गाडया बंद पडलेल्या आहे. तुम्ही ते उचलुन आणता आणि खोटी कार्यवाही दाखवता. हे जे पेपरात फोटो दिलेला आहे. तुमच्या कर्मचाऱ्यांनी दिलेला आहे. मला जर सांगितल असत तर मी समोर उभा राहिलो असतो.

**श्री.एच.एम.खान, अतिक्रमण अधिक्षक :-** आता हे फोटो पत्रकारांनी काढल की, लोकांनी काढल त्याची आम्हाला आईडिया नाही.

**श्री.नितीन बरडे :-** हे कापडाची दुकानवाल्याचे साहित्य परत करण्यासाठी कोणकोणाचे फोन आले तुम्हाला, तुम्ही कोणाकोणाचे नाव सांगितले मला.

**श्री.एच.एम.खान, अतिक्रमण अधिक्षक :-** कलेक्टर ऑफिस मधुन फोन आला.

**श्री.नितीन बरडे :-** अजुन कोणाचे फोन आले. सांगा नांव डिक्लेअर करा.

**श्री.एच.एम.खान, अतिक्रमण अधिक्षक :-** भरपुर लोकांचे आले. नांव सांगता येणार नाही. सभागृहात. कलेक्टर ऑफिस मधुन डिप्युटी कलेक्टरांचा फोन होता.

**श्री.नितीन बरडे :-** हा सामान परत करतांना यांना महापौर कार्यालयातुन फोन आले यांनी मला नाव सांगितले.

**श्री.एच.एम.खान, अतिक्रमण अधिक्षक :-** आम्ही त्यांना परवानगी दिली होती आणिती परवानगी संपली होती.

**श्री.नितीन बरडे :-** सांगा किती बॅनर अनधिकृत आहे. आमचे क्रिडा स्पर्धेचे बॅनर तुम्ही काढुन आणता.ठराव झालेला आहे का नाही विचारा. क्रिडा स्पर्धाचे बॅनर काढुन आणता तुम्ही लोक.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदया, अश्या पध्दतीने कापडाचे व्यवसाय टाकण्याच्या संदर्भात जरी परवानगी दिलेली असेल तर ती परवानगीच चुकीची आहे ना. आपल्या रस्त्यांवर इतक्या मोठया प्रमाणावर वरदळ वाढलेली आहे. आणि अश्या रस्त्यांवरती आपण शोरुम टाकायला परवानगी देतो. हे ही हास्यस्पद आहे.

**श्री.नितीन बरडे :-** त्या फोटोत बघा किती कपडे आहे.

**श्री.नितीन लढढा :-** गणपतीच्या सिझनमध्ये आपण परवानगी देतो, ते प्रासंगीक आहे. तो वर्षातुन एकदा येणारा विषय आहे. परंतु अश्या पध्दती रस्त्यावर स्टॉल लावुन कोणी व्यवसाय करत असेल रस्त्यावरती, रस्ते रहदारीसाठी आहे, चालण्यासाठी आहे की व्यवसायासाठी आहे. व्यवसायासाठी आपल्या अनेक जागा मुकाट पडलेल्या आहे तिथे परवानगी दिली तर काही हरकत नाही. परंतु अश्या रस्यावरची परवानगी द्यायची. आज अतिक्रमणाची परिस्थिती खरच भयावह झ ालेली आहे. सगळयात आधी सर्वात जास्त परिस्थिती गंभीर असेल तर आमच्या प्रभाग क्रं. ५ मधील , संपुर्ण बाजार पेठ आहे , आयुक्त साहेबांच काल पेपर मध्ये वाचलं, की फुले मार्केट मधील व्यापाऱ्यांनी याबाबतीत निवेदन दिले.आणि खुशाल आयुक्त साहेब सांगतात की सर्वपक्षीय जर याला मान्यता देत असेल तर मला काही हरकत नाहीये. अहो प्रशासनाचे कर्तव्य आहे. जरी या मोगलाईने एखाद्या चुकीच्या कामाला मान्यताही दिली . तरी ती राबवायची की नाही राबवायची किंवा ती कायद्याच्या नियमात धरून आहे किंवा नाहीये हे प्रशासनाचं कर्तव्य आहे. परंतु आयुक्त साहेब या पध्दतीने बोलतात . म्हणजे

काय झालं की यांनी याच्या मागे लागलेली घाण आमच्या मागे लावुन टाकायची .म्हणजे त्या हॉकर्स लोकांनी तुमच्याकडेही त्रास द्यायचा . विरोधी पक्ष म्हणुन आमच्याकडेही बोट दाखवायचे , आमदांराना बोट दाखवायचं हे कुठलं वक्तव्य झाले .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ते लोक सगळयांच्या वॉर्डातील आहेत.

**श्री.नितीन लढढा :-** होय ना मग आपले हे सगळयांच म्हणणं आहे. ते लोक येवुन तर सगळयांच डोकं खाणार आहेत.की आयुक्त तर अॅग्री आहेत आणि तुमचाच विरोध दिसतो त्याला , अशा पध्दतीने त्या मार्केटचं निर्माण केलेले आहे की तिथे पाय ठेवायला सुध्दा जागा नाहीये. आणि तिथे हॉकर्स ला परवानगी द्यायची आणि प्रशासनाने पदाधिकाऱ्यांकडे अश्या पध्दतीने अशा प्रकारे बोट दाखवायचं हे आयुक्त साहेबांच मुळात चुकीचं वक्तव्य आहे. अतिक्रमणा संदर्भात आपल्याला कुठलीतरी एक पॉलीसी ठरवावी लागेल. मग ती फेरीवाला धोरणा बाबतच्या संदर्भातील असेल , किंव आपण त्यांना काही मर्यादा देण्याच्या संदर्भातील असेल. ती तातडीने कुठेतरी मार्गी लावावी लागेल.याच्यामध्ये मोठया प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार होतात. म्हणजे या अतिक्रमणच्या नावाखाली लाखो रूपयांची उलाढाल होते. महिन्याचे लाखो रूपयांची उलाढाल होते.

**श्री.नितीन बरडे :-** हे २० रू . २५ रूपयांपासुन हप्ते घेतात

**श्री.नितीन लढढा :-** तुम्ही जर रविवारी नेहरू चौक , पितृछाया बिल्डिंग जवळील परिस्थिती बघाल तर तुमची गाडी जायला सुध्दा पाच मिनिटं लागतील . आणि काय होते की दिवसेंदिवस अशा गोष्टींना आपण पायबंद नाही घातला .तर धीरे धीरे याचं स्वरूप वाढत जातं. स्वरूप वाढल्यानंतर तो त्यांचा काही दिवसांनी काय होतं त्याचा अधिकार समजायला लागतात.

**मा.सभापती :-** ते काही दिवस झाल्यानंतर अधिकार दाखवतात आणि मग त्यांना जागा बघुन देणं हे ते भक्कम वाटतं .

**श्री.नितीन लढढा :-** मग त्यांना त्यांची जागेचे वेळीच प्रतिबंध घातले , पायाबंद घतला तर असे कटु प्रसंग टाळता येवु शकतात.

**श्री. विष्णु भंगाळे :-** मॅडम मार्केट मध्ये बसलेले लोकं काय करतील .

**श्री.नितीन बरडे :-** आयुक्त साहेब , मॅडम तुम्ही नुतन कॉलेजपासुन जा केतन ढाकेंच्या घराजवळ , आयसीआयसीआय बँक आहे . तेथे डिव्हायडर झालयं तिथे तुम्हाला चालायला जागा भेटणार नाही. त्यानंतर तुम्ही दर्ग्याजवळ जा तिथ चालायला जागा भेटणार नाही . तिथलं अतिक्रमण कस काय निघेल ? ही माझ्याकडे एक यादी आहे आजपर्यंत या यादीचं काही झालं नाही माझ्याकडेच ही एक यादी आहे , कुणाकडे आहे की नाही माहिती नाही, हि बेसमेंट ची यादी आहे.आजपर्यंत याच्यावर कारवाई झालेली नाही सर्वांचे पार्कींग बाहेर आहे. हि यादी तुम्हाला देतो . त्यानंतर संकलन आदेश जे अतिक्रमण आहे याचे आदेश झालेले आहेत. पण काही कारवाई नाही आणि खोटी कारवाई करून तुम्ही जर बातम्या पेपरला हेच कर्मचारी देताहेत . हेच कर्मचारी देता , ही यादी घ्या .हे तुम्हाला संकलन आदेशचे जे आहे ते देतोय .माझ्याकडे नसली तरी चालेल मी मिळवुन घेईल. हि कारवाई कधी कराल. हे छोटया मोठया लोकांचे यांचे बंद दुकानं होते , ते साईड ला लावुन ठेवले होते . दोन दुकानं , दोन खुर्च्या उचलुन आणल्या म्हणुन ही कारवाई केली . हे खोटी कारवाई दाखवु नका , गावात कीती अतिक्रमण आहे ते बघा जरा , याच्यानंतर एक जरी कर्मचारी हप्ता घेतांना सापडला तर आयुक्त साहेबांना तिथं नाही उभं केले तर मग म्हणा.

**सौ.प्रतिभा देशमुख :-** अध्यक्ष महोदय , स्वच्छता अभियानाचे येथे कोण आहेत आमच्या प्रभागात.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आमदार साहेबांचे नातलगं आहेत आहेत म्हणजे स्मितातार्ईचे काका आहेत ते . यांच्या वॉर्डामध्ये घंटागाडी रिव्हर्स घेतांना अॅक्सीडेंट झाला व त्यांचा पाय तुटला आहे .तर त्याची जबाबदारी कोण घेईल असे त्यांच म्हणणं आहे.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** या संपुर्ण वाहनांची जबाबदारी ही मक्तेदाराचीच आहे. परंतु आमचे जे सि.एस.आय. आहे या विषयाची माहिती घेतील लक्ष घालुन, त्यांच जे नुकसान असेल किंवा त्यांची जी मागणी असेल. त्या पध्दतीने आम्ही ते करु या.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, आपली मनपाची प्रॉप्रटी आहे ती भंगार होऊन. जर उद्या काही काळानंतर त्या गाडया भंगार होऊन जातील अश्या पडल्यातर. त्याच्यावरती आपण म्हटलो होतो की , पुढच्या सभेत उत्तर मिळेल. मला अपेक्षित आहे की, आज काय स्टेटस आहे त्याच. आरोग्य विभागाला एम.बी.बी.एस. सारखा एखादा डॉक्टर उपलब्ध करुन द्या.

**मा.सभापती :-** मागच्या सभेमध्ये हा विषय झालेला आहे की तिथे एक इंजिनियर आवश्यक आहे. आयुक्त साहेबांशी माझी या संदर्भात चर्चा झाली आहे. प्रशासनाने त्यांची नियुक्ती करावी अशा दोन तीन सुचना दिलेल्या आहेत.

**श्री.लासुरे, वाहन विभाग :-** आपण अॅक्सीडेंट झालेल्या गाडयांची कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. आणि जे वाहन चालक होते ज्यांच्याकडुन तो अपघात घडला ते वाहन चालक प्रत्यक्ष समोर आलेले नाहीत. आणि ते समोर न आल्यामुळे त्यांचे जे सुपरवायझर आहेत त्यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी असे सांगीतले की , त्या वाहन चालकाकडे जे लायसन्स आहे ते ट्रक्टरचे आहे आणि जो पर्यंत वाहन चालकाचा जो वाहन परवाना आहे जो पर्यंत आपल्याला प्राप्त होत नाही . तोपर्यंत कुठलीही कार्यवाही करता येणारं नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय , आपण ज्या गाडया त्याला दिलेल्या आहेत हया कोणाच्या भरवश्यावर दिलेल्या आहेत.उद्या जर बाकीच्या घंटागाडयांवर असेच जर लोक असतील तर नंतर हे आपल मनपाचा नुकसान होणार नाही का ?

कमीतकमी त्यांना एक संधी तरी देऊन हे लायसन्स काढायला लावा. आता ३ महिन्यापासुन गाडया त्यांच्याजवळ आहे तर त्या लायसन्सची पुर्तता त्यांच्याकडुन करुन घेता येईल.त्यांना फक्त अॅड करायच आहे घंटागाडीत त्या ट्रॅक्टरच लायसन्स.

**श्री.नितीन लढढा :-** तुम्ही ते विषय पुढे का नाही ठेवत.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** तुम्ही पुढे पाठवा, ती लायबलीटी आपण ठेकेदारावर देऊ शकतो. त्यानी जर विहित मुदतीत पुर्तता केली नाही तर आपण त्याच्यावर जबाबदारी निश्चित करु. तुम्ही फक्त तोंडी घाई करु नका. १५ दिवसापुर्वीच ही चर्चा झाली होती. ती फाईल तुम्ही पुढे पाठवा ना. कोणाकडे आहे ती फाईल.

**श्री.लासुरे, वाहन विभाग :-** प्रस्ताव तयार केलेला आहे. विभागप्रमुख रजेवर होते. प्रस्ताव तयार केलेला आहे. प्रस्ताव आहे माझ्याकडे. परंतु वरिष्ठ त्याच्यावर निर्णय घेत नाही.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** विभाग प्रमुख नसतांना मी फाईली केली. त्यात फायरच्या सुध्दा दोन फाईली होत्या. आपल्याला काही विषयांबाबत तातडी असेल तर मी ४० फाईली केल्याना तुमच्या, मिलींद चौधरी यांच्याकडुन आलेल्या किंवा नेहेते साहेब असतील. तुम्ही हा विषय पाठवा ना माझ्याकडे, विभागप्रमुख रजेवर होते असा विषय टाकुन पाठवा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, दंडवते साहेबांचे अभिनंदन करतो की, त्या गाडया शेवटी शेवटी पासींगच्या लाईकीच्या तरी राहिल्या. आज त्या निविदा निघालेल्या आहे. म्हणजे बोलत बोलत वर्ष का होईना. पण शेवटी शेवटी निर्णय झाला. या गाडयांचा निर्णय काय होणार.

**मा.सभापती :-** तो प्रस्ताव आजच्या आज पाठवा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, न्यु बी.जे. मार्केट गटारीमध्ये रेतीचा हा जो बाग आहे. हा जवळ जवळ पुर्ण भरल्या सारखा झालेला आहे. आऊटलेट मधुन लोकांच्या घरामध्ये, सुभाष साखला असतील. त्यांच्या घरामध्ये पाणी जात आहे. वर्षानुवर्षी सफाई होत नाही. मागे आपल्याकडे ट्रॅक्टर होते, नाल्यांसाठी एक नाला एक्सीलेटर मशिन होती त्याची परिस्थिती काय आहे. ज्या गटारी ४-४ व ५-५ फुट खोल आहे. त्या ४-४ व ५-५ इंच परिस्थिती राहिलले आहे. आपल्या मनपा कर्मचाऱ्यांना सांगुन ह्या गटारी काढल्यात. परंतु पुन्हा तेच परिस्थिती होत आहे. कारण मार्केट ऐरिया तेथे आहे. हॉस्पीटल आहे. तर आपला एक्सीलेटर कुठे आहे. आणि त्याला पर्याय म्हणुन आपण दुसरी व्यवस्था काही लावली पाहिजे या गोष्टीसाठी.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** माणसं उद्या त्या ठिकाणी पाठवुन नाला क्लीन करुन देऊ.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, घंटागाडी आठ दिवसापासुन नाही. एरियातल्या नागरीकांची तक्रार आहे. मला आजची परिस्थिती माहिती नाही. दोन दिवसापुर्वी एक घंटागाडी आली ती पण दोन गल्ल्यासोडुन चालली गेली. नागरीकांनी फोन केले पण तो काही प्रश्न सुटत नाही. याच ही उपायुक्त साहेबांना सांगुन मार्गी लावा.

**श्री.दिलीप पोकळे :-** कामं कोण करणार आणि याला जबाबदार कोणं आहे , जेणेकरून हे घंटागाडीचे जे विषय आहेत. म्हणजे घंटागाडीचा नंबर , ड्रायव्हरचा मो.नंबर , आणि तो केव्हा निघाला आहे तो टाईम आणि त्याने परत गाडी आणली तर हे याच्याबाबत काय माहिती आहे ती आम्हाला द्यावी .

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** याच्याबाबत लासुरे जीपीएस वाल्यांना बोलावुन घ्या . त्याबाबत ते माहिती देतील .

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपले कुणीतरी अधिकारी किंवा कर्मचारी ते कामं पाहात असतील ना.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** आता आनंद आहे का ?

**श्री.लासुरे , वाहन विभाग :-** हो आहे.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** आनंद किंवा पवन ला बोलवा आणि तो जो संबंधित कंपनीचा कर्मचारी आहे त्यालाही बोलवा . परंतु आमचा जो तांत्रिक स्टाफ आहे त्याच्याकडुन माहिती घेतली तर ते प्रॉपर सुरू आहे. आणि ईतरही ज्या गोष्टी आहेत त्या सुरू आहेत.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** मागे त्याला पुर्ण नोटीसा देण्यात आल्या ठेकेदाराला पुर्वी तुम्ही साहेब मागच्या मिटींगला बोलले होते १ कोटी ३७ लाख रूपये दंड झालेला होता ., चांगले अधिकारी नेमुन चौकशी करणार होते त्याचं काय झालं.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** हा विषय जो आहे आपले जे विधी सल्लागार जे आहेत मुजुमदार साहेब त्यांच्याकडे हा विषय अभिप्रायासाठी गेलेला आहे. कालही मी त्यांच्याशी बोललो काल ते काहीतरी वेगळया विषयामध्ये बिझी असल्यामुळे आज किंवा उद्या पर्यंत आपल्याला अभिप्राय देतील आणि मग तो आम्ही आयुक्त साहेबांपुढे ठेवु.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** मागच्या तीन मिटींग आधी भंगाळे साहेबांनी गटारीच्या वर पाणी वाहतय त्याच्या प्रभागात .

**श्री. नितीन बरडे :-** साहेब काय झालेले आहे की , ड्रायव्हर आहे कामगार नाहीये,त्यामुळे तो घंटागाडी एकदा भरली की तो परत येत नाही. तो फीरतोय पण अर्धाचं भाग कुठेतरी फीरतो त्याची गाडी भरतो आणि तो परत रिटर्न येत नाहीये.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** जीपीएस नुसार आता आपल्याला समजेल .

**श्री. नितीन बरडे :-** जीपीएस नुसार होईल ना पण आज कामगार नाहीना त्याच्यावर त्या गाडीवर कामगार नाहीना.कामगार कधी चालु होणार आहे.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** ग्रेडींग मशीनचे काय झाले? तिन महिने झाले तुम्हाला सांगीतले आहे.

**श्री. दिनानाथ भामरे , भांडारपाल :-** निविदा रेडी आहे ती सभापतींना तशी कल्पना दिलेली आहे.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** मागच्या मक्तेदाराचं आपण सांगता आहेत . हजर संख्या आहे कर्मचाऱ्यांची १६७ आणि गैरहजर आहेत २३३ ही आजची परिस्थिती आहे मक्तेदाराची हजर आहेत १६७ हजर आहेत.

**श्री. नितीन बरडे :-** आमच्या वॉर्डात ८ दिवसांपासुन नाहीतचं ना .

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** मागच्या

**श्री. नितीन बरडे :-** बंदच आहेत ना .

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** मी आज सकाळी ११ वाजेच्या दरम्यान माहिती घेतली .

**श्री. विष्णु भंगाळे :-** हि जबाबदारी कोणाची आहे साहेब.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** ४०० पैकी २३३ गैरहजर आहेत. व जबाबदारी ठेकेदाराची आहे.

**श्री. विष्णु भंगाळे :-** आपण त्याला जबाबदार धरू शकतो का, आपलं डिपार्टमेंट आहे , जळगांव शहर महानगरपालिकेचे

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** याचे नियोजन केलेले आहे. आपले जे काही कर्मचारी आहेत. ते रस्ते साफसफाई साठी दिलेले आहे. ठेकेदाराने आम्हाला परवा कमीटमेंट दिल होत की, काल पासुन कामगार उपस्थित राहतील. त्यानी त्यांच पेमेंट काही काढलेल नाही. आणि त्या पेमेंटमुळे कर्मचारी थांबलेले आहे.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** एकच महिन्याच बाकी आहे ना.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** हो, सकाळी काही लोक साईटवर आले परंतु ज्या वेळेस बँकेचा टाईम झाला. त्यामुळे काही लोक पैसे काढण्यासाठी बँकेत गेले. त्यामुळे ही परिस्थिती परत आली.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब माझ्या वार्डात तर बंदच आहे. तर स्वच्छतासाठी ६ दिवसाची सुट भेटणार आहे का ? थोडा ही झाडुवाला गेला नाही. थोडीही गटार काढली गेली नाही. स्वच्छता करात तुम्ही सुट द्याल का ?

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** याबाबत मी काही सांगु शकत नाही. याबाबत तुम्ही टॅक्स विभागाला विचारा. प्रॉपर्टी टॅक्स डिपार्टमेंट याबाबत आपल्याला सांगु शकेल .

**श्री.नितीन बरडे :-** तुम्ही स्वच्छता कर घेताय , वाढीव कर लावला आहे.

**श्री.नितीन बरडे :-** वाढीव कर लावला आहे , या वर्षापासुन कमी तुम्ही तो तरी कमी करायला पाहीजे.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** मागील चार दिवसांपासुन मोठया प्रमाणात कामगार कमी करण्यात आलेले आहेत आणि हा पाचवा दिवस आहे. आपण त्याला नोटीसही दिल्या आहेत , त्याने साहेबांकडे हिअरींग मध्ये कमीटमेंट ही केलं होतं. त्याप्रमाणे पेमेंट झालं परंतु पेमेंट मध्ये काही लोकं बँकेत आहेत आणि साईटवर आहेत . आणि ही संपुर्ण त्याची जबाबदारी आहे. १० तारखेला आमची चर्चाही झाली . आणि मी आयुक्त साहेबांना एक रिमाईंड करून दिलं हा सर्व विषय आपण दोन दिवसांत वर्कआऊट करू.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब मला एक सांगा जळगांव शहरात जे चौका चौकात जे बॅनर लागलेले आहेत दुकांनांच्या जाहीरातींचे तशी आम्हाला परवानगी कशी भेटेल. जाहीरातींचे बॅनर आहेत स्वातंत्र्य चौकात १५ आहेत , आकाशवाणी चौकात १६ आहेत. ख्वाजामिया चौकात आहेत. नंतर बहिणाबाई चौकात आहेत. त्याच्यावर दुकांनाच्या जाहीराती आहेत. आणि त्याचेवर कोर बॅनर पण राहतं. पाच बॅनर बुक करा एक बॅनर फ्री ही कोणती पध्दत आहे साहेब. जाहीरातींचे बॅनर लावायची .समजा बाकीचे वाढदिवस वगैरे समजु शकतो .कार्यक्रमाचे समजु शकतो दोन दिवसांचे , पण महिना महिना काढत नाहीतं .

**श्री.नितीन लढ्ढा :-** जाहीरात दारचं त्याची स्वत:ची जाहीरात करतोय.

**मा.सभापती :-** किरकोळ वसुली विभाग .

**श्री.नितीन बरडे :-** प्रत्येक टर्न च्या ठिकाणी जाहीरातींचे बॅनर आहेत.

**श्री.नरेंद्र चौधरी , अधिक्षक :-** आपण एका एजन्सीला मक्ता दिलेला आहे , त्या एजन्सीने ते बोर्ड लावलेले आहे की पाच बोर्ड लावा १ बोर्ड फ्री , ते बोर्ड लावण्यासाठी एजन्सीदाराला ३१ डिसेंबर पर्यंत परवानगी दिलेली आहे.

**श्री.नितीन बरडे :-** मग बाकीचे बोर्ड

**श्री.नरेंद्र चौधरी , अधिक्षक :-** आपण त्यांना ४१ परवानग्या दिलेल्या आहेत.

**श्री.नितीन बरडे :-** ठिक आहे मी उद्या एक एजन्सी पाठवतो मला एक परवानगी द्या , उद्या नविन एजन्स्या पाठवतो .तो भरेल त्याच्या पेक्षा १ पट जास्त पैसे मी भरेल.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** तिथं जे बोर्ड असतील ते आपण एजन्सीला निविदा दिलेली आहे.

**श्री.नितीन बरडे :-** अहो साहेब तिथ परवानगी देण्यात आल्या आहेत.

**मा.सभापती :-** या विषयी मी स्वत: पत्र दिलेले आहे, हा विषय अत्यंत गंभीर आहे. मला जाणीव आहे कारण यामुळे अनेक अपघातांना निमंत्रण दिलं जातं तसेच चुकीच्या पध्दतीने हे बोर्ड लावलेले असतात. की ज्यामुळे आपल्याला समोरची वाहन दिसतं नाहीतं.

**श्री.नितीन बरडे :-** मॅडम स्वातंत्र्य चौकात १६ बोर्ड आहेत.

**मा.सभापती :-** हो आहेत ना , प्रत्येक चौकात तीचं अवस्था आहे. पण या विषयी आपण एक परिस्थिती ..

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण या बाबतीत एक धोरणात्मक निर्णय यापुर्वी घेतलेला आहे.

**मा.सभापती :-** हो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** रस्त्यातील दुभाजकांमध्ये की तिथं ट्रॅफीक चे जे व्हिजन जे ब्लॉक होईल अशा पध्दतीच्या परवानग्या देवु नये असा एक धोरणात्मक निर्णय यापुर्वी घेतलेला आहे.त्याची बरीचं वर्ष अंमलबजावणी व्यवस्थित व्हायची .परंतु आता मंध्यतरीच्या काळात काय झालेले आहे. की आपण जाहीरातीचा ठेका दिलेला होता. त्यामुळे मनपाला उत्पन्न सुध्दा जास्त मिळतं होतं. परंतु मला वाटतं की जाहीरातीचा ठेका सुध्दा प्रसिध्द करण्यात आलेला नाहीये .याच्यामधुन महानगरपालिकेला उत्पन्नही कमी मिळतयं आणि हे असले प्रकार खुप मोठया प्रमाणामध्ये वाढतातं.

**मा.सभापती :-** या विषयी मी ती माहिती मागवली आहे , की आपण धोरणात्मक निर्णय घेतला आहे आणि त्या धोरणात्मक निर्णयाची जी पायमल्ली होतं आहे , त्या संदर्भात मला पुढची कार्यवाही करता यावी यासाठीच मी पत्र देवुन ते मागविलेले आहे . आणि विषयावर पुढची कारवाई निश्चितचं करू .

**श्री.प्रविण कोल्हे :-** पिसाळलेल्या मोकाटं कुत्र्यांचे आपल्याकडे काय नियोजन आहे ? आमच्या वॉर्डामध्ये १० ते १५ मुलांना कुत्रे चावले आहे. आपले कीती वाहने फीरता आहेत.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय आरोग्याधिकारी आले आहेत का ?

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** आपण एक एजन्सी नियुक्त केलेली आहे. त्यासाठी

**श्री.नितीन लढ्ढा :-** ती तर समजा त्याच निर्बीजीकरण करण्याच्या संदर्भात आहे . पिसाळलेल्या कुत्र्यांच्या संदर्भातील प्रश्न आहे.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** आपण ज्या एजन्सी ला कार्यादेश दिले आहे. त्यांना तसे ते व्हेटरनरी एक्सपर्टचं आहेत , त्यांना असे सांगीतले की ज्यावळेस असे कुत्रे व्हेटरनरी डिपार्टमेंट कडे तुम्ही पकडुन दिले पाहीजे किंवा तुम्ही थेट कंम्पलेंट त्या ठिकाणी केली पाहीजे .

**श्री.प्रविण कोल्हे :-** तुम्ही फक्त म्हणतात की कंम्पलेंट दिली पाहीजे.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** आपल्याला एक कंम्पलेंट देता येईल . आम्ही त्या कंम्पलेंट ची दखल घेवुन व्हेटरनरी डिपार्टमेंट शी कॉन्टॅक्ट करून आणि या एजन्सीची मदत घेवुन आम्ही त्याच्यावर कार्यवाही करू

**श्री.प्रविण कोल्हे :-** आपण मला सांगा याचे नियोजन कसे करणार आहे.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** याच्यामध्ये आपल्याला त्यांच्यामध्ये काही ट्रीटमेंट आहेत. काही बंदीश करायचे , काही उपचार आहेत. किंवा अन्य काही त्याच्यावर कारवाई करायची .तर ती आपण त्याच्यांशी चर्चा करून करू.

**श्री.प्रविण कोल्हे :-**ते कुत्रे पिसाळलेल असतात त्यांचं काय आहे.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** आरोग्य विभागाशी संपर्क करा आपण .

**श्री.प्रविण कोल्हे :-** नाही काहीचं केले नाही विचारा तुम्ही काय आहे काय नाही ते तर स्वत: नागरीकांनी पकडले आहे त्या कुत्र्यांना .

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** त्यांनी आधी कंम्पलेंट द्यायला पाहीजे होती .

**श्री.नितीन लढ्ढा :-** दंडवते साहेब आपल्याला एक सांगतो की , शेकडो निष्पाप बालकांना ते कुत्रे चावतात म्हणजे

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** आपण जी काही निविदा काढलेली आहे , पिसाळलेली कुत्री आपल्याकडे काही ठिकाणी जागा जागी आहेत. याबाबत मी एजन्सी शी चर्चा केली तर आपण त्यांच्या मदतीने व्हेटरनरी डिपार्टमेंट पर्यंत त्यांच्या पर्यंत पोहचवु शकतो .आणि आपली जी काही कंम्पलेंट आहे ती आज आम्ही आरोग्य विभागमध्ये घेवु आजचं आणि त्याची दखलही घेवु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे गावांत जी परिस्थिती निर्माण होईल .सदस्य या संदर्भातील प्रश्न उपस्थित करतील आणि त्याच्यानंतर आपण मार्गदर्शन मागवाल . पुन्हा कालांतराने घटना वाढल्या . पुन्हा प्रशासनाला हलवावं लागेल आणि पुन्हा प्रशासन त्यावेळेला जागं होईल .पुन्हा पत्रव्यवहार होतील. निष्पाप बालकांचे जीव जातात याच्यामध्ये तर या सर्व गोष्टी निर्णय घेतांना सर्वसमावेशक का घेत नाहीतं.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** ही सुचना आपली चांगली आहे आणि तर ही निविदा मागच्या ह्याच्यात प्रसिध्द झालेली होती आता त्याच्यामध्ये काही स्कोप नाही .तरी आम्ही या सुचनेचा विचार करून त्या एजन्सी कडुन हे कामं जर नियमात बसुन होण्यासारख असेल तर आम्ही त्यांना तसे लेखी विचारणाही करू. त्यांच्या कडुन खुलासा घेवु नसेल तर त्यांच्याकडुन योग्य ते आपण ..

**श्री.नितीन लढ्ढा :-** याला काहीतरी टाईम बॉड करा .

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** आम्ही त्या एजन्सीशी आजचं बोलणं करू.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभागृहामध्ये लेखी आश्वासने देतातं आणि कालांतराने काय होते की मागच्या सभेमध्ये झालेले जे विषय आहेत. ते जसेच्या तसे प्रलंबित राहतात.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** आणि मला एक सांगायचं आहे की विषय आहे वॉटर ग्रेस चा तर तो विषय आयुक्त साहेबांशी चर्चा झाल्यानंतर येईल . परंतु माझ्या माहिती प्रमाणे आरोग्य विभागाशी संबंधित आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी तुम्हाला प्रशासन म्हणुन बोलतोय , तुम्हाला व्यक्तीश: बोलतोय अश्यातला काही भाग नाहीये आपल्याकडुन किंवा मग प्रत्येक खात्याचा जो उपायुक्त असेल त्यांच्याकडुन आम्हाला अपेक्षा आहे. आमचा व्यक्तीश: कोणाशी वाद नाहीयेकिंवा व्यक्तीगत काही घेणदेण नाहीये .

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** आमचे प्रयत्नही असेच आहेत की अगदी आठवड्यातील सहा दिवसं जे काही स्टँडींग च्या आधीचे असतात . म्हणजे ज्या विभागाशी संबंधित असतात त्या विभागांनी ती मार्गी लावलेली आहेत. एखाद दुसरे कामं पेंडींग आहेत परंतु ती आम्ही करू .हया विषयाचं जे आहे याबाबतची जी तक्रार आहे ती आम्ही गांर्भीयाने घेवु आणि याबाबत नक्कीचं चांगलं सोल्युशन काढु.

**श्री.चेतन सनकत :-** मला एक सुचना द्यायची आहे. आपले आरोग्याधिकारी आले नाहीत . ते रजेवर आहेत. काही सीएसआय रजेवर गेलेले आहे. तर त्यांच्या जागी कामाच्या सोईसाठी कोणाची तरी नियुक्ती करावी. कारण साफसफाईच्या कामाची फार दुर्दशा होतेय. जे आपले सीएस आय उपलब्ध असतील . त्याच्यापैकी एकाला सहाय्यक म्हणुन ते येतील तोपर्यंत नियुक्ती करावी .कामाची दक्षता घेण्यासंदर्भात पुढील विचार करावा. जे आहेत त्यांना तातडीने नियुक्ती द्यावी. ते येतील तोपर्यंत आली कामाची लाईन सुरळीत चालेलं.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** आपण सीएसआय म्हणुन कामाची पर्यायी नेमणुक केलेली आहे.

**श्री.चेतन सनकत :-** आरोग्याधिकारी यांच्या जागी कुणाला तरी तात्पुरती नेमणुक द्यावी. कारण की पुर्ण शहराची जबाबदारी त्यांच्यावर आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय , गाळयांच्या प्रश्नावर आपण येथे चर्चा केली होती .आणि उपायुक्त गुटे साहेब त्यावेळेला येथे उपस्थित होते .आणि त्यावेळी त्यांनी सांगीतले होते गाळयांचे दर ठरविण्याच्या संदर्भातील एक मिटींग मा.जिल्हाधिकारी महोदयांच्या येथे या सोमवारी आयोजित करण्यात आलेली होती. आणि त्यानंतर संपुर्ण गाळे प्रश्नावर कश्या पध्दतीने धोरण अंवलंब करता येईल .तश्या पध्दतीची माहिती ही सभागृहात येणार होती .विषय ताई हाच होता की आज गुटे साहेब नाहीत . गाळे धारक आपल्याला सातत्याने विचारणा करतात .की नेमकं आमचं पुढचं भविष्य काय आहे.काय पॉलीसी असेल पुन्हा प्रिमीयम भरावे लागेल की भरावे लागणार नाही , भाडयांची आकारणी होईल तर ती कुठल्या दराप्रमाणे होईल .साधारणत: किती भाडे आकारणी होईल .या संदर्भातील अनेक प्रश्न त्या गाळेधारकांच्या मनामध्ये आहेत.परंतु अद्यापपावेतो गेले अनेक शासन निर्णय येवुन सुध्दा आज ४ महिन्यांचा कालावधी निघुन गेला आहे. चार महिन्यामध्ये सुध्दा शासन निर्णयाची माहिती सुध्दा सभागृहाला अवगत करण्यात आलेली नाहीये .त्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने नेमक धोरण काय लावायला पाहिजे किंवा कस धोरण असेल या संदर्भात सुध्दा माहिती प्रशासनाने दिलेली नाही. म्हणजे प्रशासन जाणीवपुर्वक माहिती देत नाही की, प्रशासनाची द्यायची इच्छा नाही. का तो विषय अजुन प्रशासनाला कळत नाही. असे अनेक प्रश्न या ठिकाणी उपस्थित होत आहे. म्हणजे पुन्हा आता या विषयावर चर्चा केव्हा करायची तर पुढच्या शुक्रवारी, आणि पुढच्या शुक्रवारी जर कोणी अधिकारी अनुपस्थित राहिला तर अजुन वेळ वाया जातो.

**श्री.नितीन बरडे :-** नविन लाईटांची व्यवस्था काय आहे बघा, नविन गाडया काही केल्या होत्या आपण. आज लाईटांची व्यवस्था काही हुन नाही राहीली.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** याच्या मध्ये घंटागाडी टाईपची जी गाडी आहे, म्हणजे छोटया स्वरुपाची गाडी आहे. छोटया स्वरुपाची म्हणजे छोटया गल्लीत जात. हॅंडरोलीक म्हणजे मशिन ॲपरेटेड नाही हॅन्ड ॲपरेटेड आहे. त्याची एक डिझाईन आम्ही वर्धा, नागपुरला बनविली होती. त्या डिझाईनप्रमाणे जी आहे वाहन विभागाने बनवायला वर्क ऑर्डर पण दिलेली आहे. त्या दोन गाडया बनतील आणि दुसऱ्या ज्या बॉडी बांधणीच्या गाडया होत्या. त्याच्यामध्ये जी.बी. ला मागच्या वेळेस एक ठराव झालेला होता.

**श्री.नितीन बरडे :-** ते लवकर करा साहेब.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य :-** ते प्रपोजल आपण जी.बी. पुढे ठेवलेल आहे. आता या जी.बी.ला तो विषय आहे. जी.बी.च्या ठरावाच्या अनुषंगाने आम्ही प्रपोजल दिलेला आहे. एक तर नविन निविदा नाही तर जुन्या निविदा काढायला वर्क ऑर्डर देतील. असे झाल्यानंतर त्या दोन गाडयंच विषय फाईनल होईल.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २०३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, अग्निशमन व आणीबाणी सेवेकरिता अग्निशमन विभागासाठी महानगरपालिका गाळे भाडे निधी (मनपा फंड) / जिल्हा नियोजन निधी अंतर्गत TATA LPT १६१३ Cowl Chassis BS IV -३ नग खरेदी करण्यात आलेल्या असुन सदर चेसीसवर फायर फायटरची बांधणी करणे कामी ई-निविदा प्रसिध्द करणेस मान्यतेअंती ई-निविदा सुचना क्रं.१४५० सन २०१९-२० अन्वये प्रसिध्दीअंती तीन निविदाकारांनी सहभाग नोंदविलेला आहे. त्यानुसार निविदेत सहभागी झालेले निविदाकारांपैकी १) देवी फायर सर्व्हीसेस,सोलापुर, २) हायटेक सर्व्हीसेस,पुणे यांनी खालील प्रमाणे दर दिलेले आहेत.

| Sr no | Description of work | Quantity | Rate Including all taxes | |
|---|---|---|---|---|
| | | | Devi Fire Services, Solapur | Hi-Tech Services, Pune |
| १ | Fabrication, Erection, Testing ,Commissioning & Supply of Fire Water Tender On TATA १६१३/४२ BS IV Model Chassis – ३ nos provided by Jalgaon Municipal Corporation | 0३ nos | १,३७,७०,६५४.४८/- | १,४८,३७,५८०/- |
| | **Grand Total Rs.** | | १,३७,७०,६५४.४८/- | १,४८,३७,५८०/- |

देवी फायर सर्व्हीसेस,सोलापुर यांचे आलेले सर्वात कमीचे दर रक्कम रु. १,३७,७०,६५४/-मात्र अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२३% कमी चे आलेले आहेत. सदरचे आलेले दर हे अंदाजपत्रकीयदरापेक्षा कमीचे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ खंड (क) च्या तरतुदीच्या अधीन राहुन L1 निविदाकार यांची निविदा स्वीकृत करणे व संविदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.
राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**